१९३७-२०२६ वर्ष १० वे

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार | दि. १२ नोव्हेंबर २०२६ | अंक १५६ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

दरीत कोसळून युवकाचा मृत्यू

माणगाव : निसर्गाचे सौंदर्य डोळ्यांत साठवण्यासाठी पर्यटनाला आलेल्या तरुणांवर काळाने घाला घातला. ताम्हिणी घाटातील प्रसिद्ध मिल्की बार वॉटरफॉल येथे ४५० फूट खोल दरीत कोसळून एका २० वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. शाहिद अन्सारी (२०) असे मृत युवकाचे नाव आहे. या दुर्घटनेमुळे पर्यटनस्थळी एकच खळबळ उडाली असून, हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून चार युवक पर्यटनासाठी ताम्हिणी घाटात आले होते. पर्यटनाचा आनंद घेतल्यानंतर परतीच्या प्रवासादरम्यान त्यांच्यापैकी दोघांनी धोकादायक कड्यावरून चढण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, त्यांच्याकडे गिर्यारोहणाचा कोणताही अनुभव किंवा •➤पान २ वर

केदारनाथ धामचे कपाट बंद

केदारनाथ : उत्तराखंडमधील जगप्रसिद्ध अकरावे ज्योतिर्लिंग श्री केदारनाथ धामचे कपाट बुधवारी (दि.११) भाऊबीजेच्या पावन पर्वावर पुढील सहा महिन्यांच्या शीतकालीन कालावधीसाठी अधिकृतपणे बंद करण्यात आले आहे. सकाळी ठीक साडेआठ वाजता पारंपरिक वैदिक मंत्रोचार, विशेष पूजा-अर्चा आणि स्थानिक वाद्यवृंदाच्या गजरात मंदिराचे मुख्य द्वार बंद करण्यात आले. लष्कराच्या बँडच्या गजरात पंचमुखी डोली ऊखीमठकडे रवानाकपाट बंद करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भगवान केदारनाथ यांची चल विग्रह पंचमुखी उत्सव डोली मंदिराच्या गर्भगृहातून बाहेर आणण्यात आली.

वे|ध|क

१०० फूट खोल कोसळला युवक



पनवेल : १६ वर्षीय युवक कर्नाळा स्पोर्ट्सजवळील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या नवीन उड्डाणपुलावरून सुमारे १०० फूट खाली पडल्याची घटना घडली. ही घटना मंगळवारी (दि.१०) रात्री सव्वादहाच्या सुमारास घडली असून, या युवकाला बाहेर काढण्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन जवानांना प्रतिकूल परिस्थितीत धाडसी बचावकार्य •➤पान २ वर

ट्रेलरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

नागोठणे : नयन वारगुडा (२१) हा सुभाष वारगुडा (२६) याच्यासह दुचाकीने मुंबई-गोवा महामार्गावरून नागोठणे येथे जात होता. ते महामार्गावरील



कामत हॉटेल जवळ आले असता त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरने जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी चालक नयन वारगुडा हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्या मागे बसलेला सुभाष वारगुडा याचा जागीच मृत्यू झाला. जखमीला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, या प्रकरणी ट्रेलर चालक ओम कृष्णा द्विवेदी याच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहशतवाद्यांकडून गोळीबार

जम्मू-काश्मीर : दक्षिण काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यातील मीरबाजार येथे बुधवारी (दि.११) दुपारी संशयित दहशतवाद्यांनी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या सुरक्षा चौकीवर गोळीबार केल्याची घटना घडली. या हल्ल्यात सीआरपीएफचे तीन जवान जखमी झाले आहेत. दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी हा हल्ला केल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २.१५ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी नाका चौकीवर तैनात असलेल्या जवानांवर अचानक गोळीबार केला. हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केल्यानंतर ते घटनास्थळावरून पसार झाले.

रायगड जिल्ह्यावर पाणीकपातीचं संकट

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

यंदा पावसाने लवकरच दडी मारल्याने जिल्ह्यातील धरणांमधील जलसाठा हळूहळू कमी होऊ लागला आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच या धरणांमधील पंधरा टक्के जलसाठा कमी झाला असून, आता फक्त ८५ टक्केच जलसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे जून महिन्यापर्यंत जलसाठा पुरविण्यासाठी पाणी कपातीचे संकट सुरु झाले आहे. त्यासाठी जिल्ह्यात १० टक्के पाणीकपात करण्यात आली आहे. काही ठिकाणी एक, तर काही ठिकाणी दोन दिवस आड पाणी पुरवठा करण्यास सुरूवात झाली आहे. तसेच, नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहनही लघु पाट बंधारे विभागाकडून करण्यात आले आहे.

२०११च्या जनगणनेनुसार, रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २६ लाख २४ हजार २०० इतकी आहे. त्यात ग्रामीण लोकसंख्या १६ लाख ६४ हजार ५ आणि शहरी भागाची लोकसंख्या ९ लाख ७० हजार १९५ इतकी आहे. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीसाठी पाण्याचा मुबलक पुरवठा व्हावा, म्हणून रायगड जिल्ह्यात लघु पाट बंधारे विभागाअंतर्गत २८ धरणे बांधण्यात आली आहेत. या धरणांद्वारे पाणी पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील मुरूड, उरण, तळा, रोहा, पेण व अलिबाग या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक असे एकूण पाच, सुधागडमध्ये पाच, श्रीवर्धन, खालापूर आणि पनवेलमध्ये प्रत्येकी तीन, म्हसळा, कर्जतमध्ये प्रत्येकी दोन, महाडमध्ये चार धरणांचा समावेश आहे. जिल्ह्यातील या धरणांत ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. यंदा पावसाने उशीरा हजेरी लावली असली, तरी धरण भागात ८७ हजार ९४३ मि.मी.पाऊस पडला. कोरडी पडलेली धरणे पाण्याने तुडूंब भरली. मात्र, सप्टेंबरपासून पावसाने दडी मारल्यामुळे धरणांमधील जलसाठा लवकर कमी होऊ लागला. सद्यस्थितीत नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यामध्ये धरणांमधील साधारणपणे १५ टक्के जलसाठा कमी झाला आहे. त्यामुळे आता फक्त ८५ टक्के जलसाठा शिल्लक असल्याची माहिती समोर आली आहे.

जिल्ह्यातील आठ धरणांमध्ये ९५ ते ९९ टक्के, सहा धरणांमध्ये ९० ते ९४ टक्के, १० धरणांमध्ये ८१ ते ८९ टक्के, दोन •➤पान २ वर

जलसाठ्यावर दृष्टीक्षेप

फणसाड ९८ टक्के, वावा ९३ टक्के, सुतारवाडी ९६ टक्के, आंबेघर ९२ टक्के, कोंडगाव ९८ टक्के, ढोकशेत ९० टक्के, कुडकी ९२ टक्के, पाभरे ९७ टक्के, संदेरी ९५ टक्के, खिंडवाडी ९५ टक्के, कोथुर्डे ९२ टक्के, भिलवले ९७ टक्के, कलोते-मोकाशी ९४ टक्के, मोरबे ९९ टक्के. श्रीगाव ८४ टक्के, घोटवडे ८९ टक्के, कवेळे ८५ टक्के, उन्हेरे ८५ टक्के, वरंध ८६ टक्के, खैरे ८१ टक्के, साळोख ८६ टक्के, अवसरे ८६ टक्के, बामणोली ८७ टक्के, उसरण ८१ टक्के, डोणवत ७४ टक्के, पुनाडे ७९ टक्के, कार्ले ५४ टक्के, रानीवली ४३ टक्के.

धरणे दुरुस्तीचा प्रश्न प्रलंबित

जिल्ह्यातील पन्नास टक्केहुन अधिक धरणे ही तीस ते चाळीस वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहेत. ही धरणे त्याकाळी मातीने बांधली गेली आहेत. त्यामुळे काही धरणांना गळतीही लागलेली आहे. मात्र, धरणाच्या दुरुस्तीचा प्रश्न शासनस्तरावर प्रलंबित आहे. दुष्काळ परिस्थितीत धरणाची दुरुस्ती करून घेण्याचे आढावा बैठकीत अनेक वेळा ठरले आहे. मात्र, त्याबाबत ठोस पावले उचलताना प्रशासन दिसून येत नाही

- **धरणांमधील १५ टक्के जलसाठा कमी**
- **१० टक्के पाणी कपात करण्याची नामुष्की**

प्रशासनासमोर गंभीर प्रश्न

एल निनोमुळे यावर्षी पावसाचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे यंदा पाऊस उशीरा येऊन लवकर गायब झाला. जिल्ह्यात ९२ टक्के सरासरी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील २८ धरण भागातही समाधानकारक पाऊस पडला. मात्र, गतवर्षी पेक्षा ५१ हजार मिमी पाऊस कमी पडला आहे. गतवर्षी एक लाख ३९ हजार मिमी पाऊस पडला होता. तर, यंदा ८७ हजार ९४३ मिमी पाऊस धरण भागात पडला आहे. त्यामुळे यंदा धरणातील जलसाठा जूनपर्यंत शिल्लक ठेवणे हे प्रशासनासमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



भाऊरायांची कोंडी

पोलिसांची दमछाक; प्रवासी वर्गात प्रचंड नाराजी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

भाऊबीजेनिमित्त बहिणाकडे जाणाऱ्या भावांचा प्रवास वाहतूक कोंडीतून झाल्याचे चित्र बुधवारी (दि.११) सकाळपासून पहावयास मिळाले. अलिबाग-रोहा मार्गासह पोयनाड-अलिबाग रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीत अडकलेल्या भावांना त्यांच्या बहिणीच्या घरी वेळेवर पोहचता आले नसल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी अलिबाग-रोहा मार्गावरील कुरुळ ते बेलकडे मार्गावर दोन ते तीन किलोमीटर अंतरावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. ही कोंडी सोडविताना वाहतूक पोलीसांची दमछाक उडाली.

भाऊबीजेनिमित्ता बहिणीकडे जाण्यासाठी भावांनी तयारी केली होती. काहीजण सकाळी ६ वाजता, निघाले, तर काहीजण १० वाजता घरातून निघाले. त्यांची बहिणीकडे जाण्याची ओढ प्रचंड होती. काहीजण दुचाकी, चारचाकी,



तर काहीजण एसटी बसने निघाले होते. मात्र, नागावपासून कुरुळपर्यंत तसेच कुरुळपासून बेलकडेपर्यंत सकाळपासूनच मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीमुळे वेळेवर बहिणीच्या सासरी पोहचता आले नसल्याने भावांनी वाहतूक व्यवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, वाहतूक कोंडी झाली असताना वाहतूक पोलीस नसल्याने गाडीतील काही तरुणांनी पुढाकार घेत वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, वाहनांची संख्या प्रचंड वाढली होती. सुट्टीचा दिवस असल्याने पर्यटकांची वाहनांची वर्दळही या मार्गावर वाढली होती. अखेर वाहतूक पोलीसांसह होमगार्ड जवानांनी दुचाकीवरून बेलकडे फाटा गाठला. त्यांनी वाहतूक कोंडी सोडविण्याचा शर्तीचा प्रयत्न केला. मात्र, ही कोंडी सोडविताना त्यांची प्रचंड दमछाक उडाली. त्यानंतर आणखी वाहतूक पोलीस आले. अखेर शर्तीच्या प्रयत्नाने वाहतूक कोंडी सुरळीत करण्यास वाहतूक पोलिसांना यश आले.

महेंद्र थोरवे आमदारकीचा राजीनामा द्या

। खोपोली । प्रतिनिधी ।

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील राजकीय संघर्ष आता वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या टोकाला पोहोचला आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्यावर केलेल्या टीकेला घारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. 'महेंद्र थोरवे यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा. त्यांना राजकीय मैदानात चितपट केले नाही तर सुधाकर घारे नाव सांगणार नाही,' असे खुले आव्हान घारे यांनी दिले आहे.

कर्जत तालुक्यातील प्रस्तावित टोरंट पॉवर प्रकल्प आणि खालापूरमधील इथेनॉल कंपनीच्या मुद्द्यावरून महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील

- **सुधाकर घारेंचे खुले आव्हान**

संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. त्यातच आमदार महेंद्र थोरवे यांनी दिवाळीच्या दिवशी राष्ट्रवादीचे नेते आणि तटकरे कुटुंबीयांसह सुधाकर घारे यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. विधानसभा निवडणुकीत तीन-चार सुधाकर घारे नावाचे डमी उमेदवार उभे करण्यात आले होते आणि भाजपच्या मदतीमुळेच आपण आमदार झालात, असा आरोप घारे यांनी केला. आमदार थोरवे यांनी दिवाळीसारख्या सणाच्या दिवशी मतदारसंघातील नागरिकांना आणि •➤पान २ वर

बोरघाटात मृत्यूचा थरार



। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असून, बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत मंगळवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून, तिघेजण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, •➤पान २ वर

टोरंटसाठी सरकारच्या पायघड्या

। कर्जत । प्रतिनिधी ।

टोरंट कंपनीकडून अजूनही कुरापत्या सुरूच असून, एवढे मोठे आंदोलन उभे राहिल्यानंतर देखील जमिनीचे सर्वेक्षण सुरू करण्याची हिंमत सरकार दाखवत आहे. धरण परिसरात जंगल तोडलेल्या ठिकाणी जमिनीचे सीमांकन करण्यासाठी काही सर्वेक्षण करणारे कर्मचारी पोहचले असता त्यांना पिटाळून लावण्याचे काम स्थानिक आणि शिवसैनिक यांनी केले. दरम्यान, सरकारकडून जमीन सर्वेक्षण करण्याचे निमित्ताने प्रोत्साहन देण्याचे काम सुरू असून, शिवसेना ठाकरे पक्षाने येथे आपण कोणालाही येऊ देणार नाही, असा सज्जड दम भरला आहे.

पाली सायडोंगर परिसरात वृक्षतोड सुरू झाल्यानंतर या प्रकल्पाविरोधात राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. सरकारवर चोहोबाजूंनी विरोध केला जात असून, पर्यावरण प्रेमी आक्रमक झाले आहेत. •➤पान २ वर



- **सायडोंगरात जमीन सर्वेक्षणाचे काम सुरू**
- **ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक**

हजारो दिव्यांनी उजळला इतिहास

कान्होजी आंग्रे समाधी स्थळाजवळ दिव्यांची आरास

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

दीपावली पाडव्याचा सर्वत्र उत्साह असताना अलिबाग येथील सरखेल कान्होजी आंग्रे समाधी परिसर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारकाच्या परिसरात दिवे लावण्यात आले. या लक्ष दिव्यांनी शिवकालीन आणि आंग्रे कालीन इतिहास उजाळल्याचे चित्र दिसून आले.

दरवर्षी दीपावली पाडवाच्या दिवशी अलिबागमधील सरखेल कान्होजी आंग्रे समाधी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक परिसरात लक्ष दिव्यांचा कार्यक्रम आयोजित केला जातो. स्वराज्यातील असंख्य ज्ञात-अज्ञात वीरांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देश्याने हा सोहळा आयोजित केला जातो. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी हा सोहळा मंगळवारी (दि.१०) अतिशय उत्साहाने आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान अलिबाग विभाग, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक उत्सव समिती अलिबाग, कुलाबा ढोल ताशा ध्वज पथक अलिबाग व शिवशंभू प्रेमी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी जवळ जवळ २४०० दिवे प्रज्वलित करून छत्रपती शिवरायांना आणि सरखेल कान्होजी आंग्रे •➤पान २ वर



• (छायाचित्रः समीर मालोदे)

कारने पोलिसाला फरफटत नेले

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

नाकाबंदीदरम्यान वाहन थांबविण्याचा इशारा करणाऱ्या पोलीसकर्मचाऱ्यालाचभरधावकारने धडक देत सुमारे २०० मीटरपर्यंत फरफटत नेल्याची धक्कादायक घटना कळंबोली परिसरात घडली. या घटनेत पोलीस कॉन्स्टेबल दिलीप भोई गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली परिसरात पोलिसांकडून नियमित नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू होती. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या स्विफ्ट डिझायर कारला पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने वाहन थांबविण्याऐवजी समोर उभे असलेले पोलीस कॉन्स्टेबल दिलीप भोई यांना जोरदार धडक दिली. धडकेमुळे भोई



हे कारच्या बोनेटवर पडले. तरीही चालकाने कार न थांबवता त्यांना सुमारे २०० मीटरपर्यंत फरफटत नेले. या घटनेनंतर चालकाने कारसह घटनास्थळावरून पळ काढला. विशेष म्हणजे, संबंधित कारवरील नंबर प्लेट बनावट असल्याचे तपासात समोर आले आहे. कारमध्ये दोन व्यक्ती असल्याची माहिती असून, त्यांचा शोध घेण्यासाठी कळंबोली पोलिसांनी तपास सुरू केला आहे. परिसरातील •➤पान २ वर

८०० हून अधिक योजना पुर्ण | १३९ कोटींचे बील थकीत

ठेकेदारांची दिवाळी अंधारात

प्रमोद जाधव

। रायगड ।

रायगड जिल्ह्यात 'हरघर जल' ही संकल्पना घेत केंद्र सरकार पुरस्कृत जल जीवन योजना राबविण्यात आली. यावेळी ८००हून अधिक योजना पूर्ण झाल्या. परंतु, कामे पुर्ण होऊनही जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा योजनेकडून कामांची बिलेच दिली नसल्याचा आरोप ठेकेदारांकडून करण्यात आला आहे. या योजनेच्या कामाचे १३९ कोटी रुपये जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्यांची यंदाची दिवाळी अंधारात गेल्याचे सांगण्यात आले आहे.

रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून जलजीवन योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. ही योजना पाणी टंचाई दुर करण्यासाठी प्रति माणसी ५५ लिटर पाणी मिळावे, यासाठी सुरु केली. रायगड जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाी यंत्रणा कामाला लागली. यावेळी एका ठेकेदाराकडे तीन ते चार अथवा त्यापेक्षा कामे सोपविण्यात



डिपॉजीट केलेल्या रक्कमेपासून वंचित

जलजीवन योजनेअंतर्गत मिळालेल्या कामांसाठी काही रक्कम ठेकेदारांनी कार्यालयात डिपॉझिट केली आहे. १३९ कोटी रुपयांमधील ५ टक्के निधी प्रमाणे साधारण २८ कोटीहून अधिक रुपयांचा निधी शासनाच्या तिजोरीत जमा असल्याची माहिती ठेकेदारांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे डिपॉझिट केलेली रक्कम तरी देण्यात यावी, अशी मागणी जिल्हा परिषद ठेकेदार युनियन करून करण्यात आली आहे. मात्र, या रकमेपासून अजूनही वंचित असल्याचे सांगण्यात आले आहे.

आली. काही ठिकाणी विहीरी बांधण्यासह रस्त्याच्या साईटपट्टी खोदून मोठे पाईप टाकण्यात आले. अनेक गावांतील घरासमोर नळ कनेक्शन जोडण्यात आले. त्यामुळे पाणी मिळेल या आशेने नागरीक आनंदी झाले होते.

यावेळी जिल्ह्यामध्ये जलजीवनच्या १ हजार ४९६ योजना राबविण्यात आल्या. त्यापैकी ८८९ योजना पुर्ण झाल्या. त्यातील ६१५ योजना गावांना हस्तांतरित करण्यात आल्या. मात्र, आजही ६०७ योजना अपूर्ण स्थितीत आहेत. जिल्ह्यामध्ये जलजीवन योजनेची फक्त ६० टक्केच कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरित ४० टक्के कामे अपुर्ण आहेत. जिल्ह्यातील १६ योजनांची २५ टक्के कामे झाली आहेत. १३४ योजनांची ५० टक्के, २८२ योजनांची ७५ टक्के, १६९ योजनांची ९५ टक्के कामे झाल्याची माहिती समोर आली आहे. प्रति माणसी ५५ •➤पान २ वर

> "जलजीवन योजनेचे काम केलेले १३९ कोटी रुपयांचे बील थकीत आहे. शासनाकडून निधी अद्याप आला नाही. त्यामुळे बील थकले आहे. याबाबत बैठकाही झाल्या आहेत. शासनाकडे निधीची मागणी केली आहे.
> – मोहन सरोवदे, कार्यकारी अभियंता, राजिप ग्रामीण पाणी पुरवठा विभाग"

जिल्ह्यात भाऊबीज उत्साहात

पारंपारिक पद्धतीने औक्षण करून सण साजरा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

भावा, बहिणीच्या पवित्र प्रेमाचे प्रतिक असलेला भाऊबीज सण रायगड जिल्ह्यामध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पारंपारिक पद्धतीने बहिणीने भावाचे औक्षण केले. त्यानंतर दिर्घ आयुष्यासह, उत्तम आरोग्य आणि सुख समृद्धीसाठी एकमेकांनी प्रार्थना केली.

दिवाळीला सुरुवात झाल्यानंतर बलिप्रतिपदेच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि.११) भाऊबीज हा सण साजर करण्यात आला. यावेळी घरी भाऊबीजेसाठी येणाऱ्या भावाच्या स्वागतासाठी बहिणींनी जय्यत तयारी केली होती. घरासमोर रांगोळी काढण्यात आली. भावाचे घरात



आगमन होताच त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दिवाळीच्या फराळासोबतच कोकणी पद्धतीचे गोड पदार्थ आणि ओवाळणीच्या भेटवस्तूंची देवाणघेवाण करण्यात आली. प्रत्येकाने आपल्या परिने हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. दरम्यान, •➤पान २ वर

समुद्रावर परप्रांतीयांचा वाढता कब्जा

। उरण । प्रतिनिधी ।

रायगडच्या समुद्रावर पिढ्यान्‌पिढ्या कोळी समाजाने आपले कष्ट, घाम आणि अनुभवाच्या जोरावर मासेमारीचा व्यवसाय उभा केला. मात्र, आज याच पारंपरिक व्यवसायाचे चित्र झपाट्याने बदलत आहे. बोटी कोळी समाजाच्या मालकीच्या, गुंतवणूक स्थानिक मच्छीमारांची; परंतु, समुद्रात बोटी नेण्यापासून जाळी हाताळणे, मासळी पकडणे आणि ती किनाऱ्यावर आणण्यापर्यंतच्या कामांमध्ये उत्तर प्रदेश, बिहारसह अन्य राज्यांतील कामगारांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे 'बोटी स्थानिकांच्या, मात्र समुद्रावरील प्रत्यक्ष कामकाज परप्रांतीयांच्या हातात' असे चित्र निर्माण होत असून, कोळी समाजाच्या पारंपरिक व्यवसायाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

शेती आणि मासेमारी हा रायगड जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा



महत्त्वाचा आधार आहे. १५ ऑगस्टनंतर मासेमारीचा हंगाम सुरू झाल्यानंतर समुद्रात पुन्हा बोटींची वर्दळ वाढली आहे. यंदा मासेमारीसाठी जिल्ह्यात सुमारे २५ हजार पुरुष कामगार, तर मासळी वेगळी करणे, सुकवणे इत्यादी कामांसाठी सुमारे ५ हजार महिला कामगार आल्याचे सांगण्यात येते. यामध्ये परराज्यांतील कामगारांचा मोठा सहभाग असल्याने स्थानिकांच्या पारंपरिक व्यवसायातील बदल अधोरेखित होत आहेत.

मासेमारी व्यवसायात अनुभवी कामगारांची मोठी गरज असते. बोटीवरील तांडेलला दिवसाला सुमारे १,५०० रुपये, तर अन्य कामगारांना सुमारे १ हजार रुपये मजुरी द्यावी लागते. त्याशिवाय जेवण आणि राहण्याची जबाबदारीही बोटमालकांवर असते. डोली, पर्सनेट आणि एलईडी मासेमारीसाठी अनुक्रमे पाच, आठ आणि १५ किंवा त्यापेक्षा अधिक कामगारांची आवश्यकता असते. त्यामुळे अनुभवी कामगारांसाठी बोटमालकांना परराज्यांतील कामगारांवर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र, हा प्रश्न केवळ कामगार मिळण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. स्थानिक तरुण मासेमारी व्यवसायापासून दूर जात असताना परराज्यांतील कामगार नाखवा म्हणून काम करणे, जाळी हाताळणे आणि खोल समुद्रातील मासेमारीचे कौशल्य आत्मसात करत आहेत. काही ठिकाणी मासळीच्या लिलावातील हिस्सा देण्यापर्यंत परिस्थिती पोहोचल्याचे सांगण्यात येते. म्हणजेच बोटमालक स्थानिक असले तरी प्रत्यक्ष व्यवसायातील कौशल्य आणि कामकाजाचा अनुभव दुसऱ्यांकडे केंद्रित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अखिल कोळी समाज परिषदेचे ॲड. जे.टी. पाटील यांनीही या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. कोळी समाजातील सुशिक्षित तरुण नोकरीला प्राधान्य देत असून त्यांनी पुन्हा मासेमारी व्यवसायाकडे वळण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात पारंपरिक मासेमारी व्यवसायावर परप्रांतीयांचे वर्चस्व वाढण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

स्थानिकांना प्रोत्साहनाची गरज

शासनानेही स्थानिक तरुणांना प्रशिक्षण, आर्थिक मदत, आधुनिक बोटी, जाळी, कोल्ड स्टोरेज आणि मासळी प्रक्रिया केंद्रे उपलब्ध करून देण्याची गरज आहे.परराज्यांतील कामगार रोजगारासाठी येत असले तरी स्थानिक कोळी समाजाच्या पारंपरिक व्यवसायातील कौशल्य, आर्थिक सहभाग आणि पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक तरुणांना प्रोत्साहन देणे आणि मच्छीमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. आज बोटी तुमच्या, गुंतवणूक तुमची; पण उद्या मासेमारीचे संपूर्ण नियंत्रण दुसऱ्यांच्या हातात गेले तर केवळ हात चोळत बसण्याची वेळ येईल. समुद्र कोळी समाजाचा पारंपरिक वारसा आहे. तो टिकवण्यासाठी आता तरी स्थानिकांनी जागे होण्याची आणि शासनाने ठोस उपाययोजना करण्याची वेळ आली आहे.

तरूण पिढीची पाठ

मच्छीमार आधीच आर्थिक संकटात आहेत. डिझेलचे वाढते दर, बोटींची देखभाल, जाळ्यांचा खर्च, मजुरी, कोल्ड स्टोरेजचा अभाव, मासळी साठवणुकीतील नुकसान आणि बाजारपेठेतील मध्यस्थ यामुळे मच्छीमारांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. समुद्रात जीव धोक्यात घालून मासेमारी करायची आणि बाजारपेठेत योग्य भाव मिळवण्यासाठी संघर्ष करायचा, अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे तरुण पिढी या व्यवसायाकडे पाठ फिरवत असल्याचेही चित्र आहे.



उरणच्या पाण्याशी खेळू नका

■ **घनःश्याम कडू यांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे**

। उरण । प्रतिनिधी ।

उरणमध्ये विकासाच्या नावाखाली सिमेंट-काँक्रीटचे जंगल उभे राहत आहे. सिडकोने द्रोणागिरी नोडच्या माध्यमातून नवे शहर वसविले, मोठमोठ्या इमारती आणि गृहसंकुले उभी राहत आहेत; मात्र, या वाढत्या लोकवस्तीची तहान भागविण्यासाठी पाण्याचे नियोजन कुठे आहे? एकीकडे नव्या शहरांचा विस्तार सुरू आहे, तर दुसरीकडे उरणच्या पाणीपुरवठ्याचा महत्त्वाचा आधार असलेल्या रानसई धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. विकासाच्या नावाखाली इमारती उभ्या करणाऱ्यांनी आधी पाण्याची हमी द्यावी, अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते घनःश्याम कडू यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

उरण तालुक्यात औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाचा वेग प्रचंड वाढत आहे. द्रोणागिरी नोडमध्ये सिडकोकडून नव्या नागरी वसाहती विकसित केल्या जात आहेत. मात्र, लोकसंख्येचा वाढता भार लक्षात घेऊन पाण्याचे नवे स्रोत निर्माण करण्याची जबाबदारी कोणाची? घरे बांधायची, भूखंड विकसित करायचे, शहराचा विस्तार करायचा; पण नागरिकांच्या घशाला कोरड पडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा सवाल आता ऐरणीवर आला आहे. तालुक्यासाठी रानसई धरण हा पाणीपुरवठ्याचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. मात्र, या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणी साठवण क्षमतेवर परिणाम होत असल्याची बाब पुढे आली आहे. धरणातील गाळ काढून साठवण क्षमता वाढविण्यासाठी शासनाने आजपर्यंत अपेक्षित ठोस पुढाकार घेतलेला नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. एकीकडे पाण्याची मागणी वाढत आहे, तर दुसरीकडे उपलब्ध जलसाठ्याची क्षमता वाढविण्याकडे दुर्लक्ष होत असेल तर भविष्यातील संकटाला निमंत्रणच ठरणार आहे.

पूर्वी उरण शहर आणि तालुक्यातील गावांची तहान तलाव आणि विहिरी भागवत होत्या. मात्र, पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यानंतर या नैसर्गिक जलस्रोतांचा वापर कमी झाला. देखभालीअभावी अनेक विहिरींमध्ये गाळ आणि कचरा साचला, काही विहिरी बुजविण्यात आल्या, तर तलावांचीही दुरवस्था झाली. विशेष म्हणजे काही जुन्या विहिरींमध्ये आजही बारमाही पाणी उपलब्ध असतानाही त्याचा वापर होत नाही. राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असताना पाणीदार कोकणालाही त्याची झळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. बदलते हवामान, अनियमित पाऊस आणि वाढते तापमान यामुळे पाण्याचे बाष्पीभवन वाढत आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई रोखण्यासाठी आजपासूनच पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ एमआयडीसीच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहून चालणार नाही. स्थानिक जलस्रोत जिवंत ठेवणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर घनःश्याम कडू यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.

८१ वर्षीय अनंत कर्वेंनी जपला छंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील निवृत्त अधिकारी अनंत कर्वे आपली हस्तकला, चित्रकला आणि टाकावू पासून टिकावू हा छंद जपण्याचे कार्य वयाच्या ८१ व्या वर्षी देखील करीत आहेत. नेहमीप्रमाणे टाकावू पासून टिकावू असे पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवून आपली आवड अनंत कर्वे यांनी जपली आहे. बांबूच्या काठ्या, कागदाच्या लगद्यापासून लहान काठ्या आणि कागद यांच्यापासून अनंत कर्वे यांनी सालाबादप्रमाणे दिवाळीसाठी आकाश कंदील साकारला आहे. दिवाळी सणाच्या आधी शाळांमध्ये जाऊन आकाश कंदील बनवण्याचे प्रशिक्षण देणारे कर्वे हे सातत्याने वेगवगेळ्या प्रकाराचे कंदील बनवून विद्यार्थांनी आपली घरी दिवाळीसाठी लावावेत यासाठी आग्रह धरत असतात. विद्यार्थ्यांनी शाळांची सुट्टी सत्कारणी लावावी असे त्यांचे म्हणणे असते आणि स्वतःच्या हाताने बनवलेला कंदील आपल्या दारी बांधावा यासाठी प्रयत्न करीत असतात. अनंत कर्वे गेली ६५ वर्षे ही कला जोपासून आहेत.



उरणच्या वीजसंकटावर कायमस्वरुपी तोडगा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरणकरांच्या नशिबी आलेला विजेचा लपंडाव संपणार तरी कधी? वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी-जास्त दाबाचा त्रास आणि वीज वितरणातील अनियमिततेमुळे नागरिक, व्यापारी व व्यावसाधिक त्रस्त झाले आहेत. या समस्येवर तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी दिघोडे येथे अंडरग्राउंड केबलसह सबस्टेशन उभारण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर व कुंदा ठाकूर या दाम्पत्याने उरणच्या वीजसमस्येचा प्रश्न गांभीर्याने घेत खासदार सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे दिघोडे येथे सबस्टेशन



उभारण्याची मागणी केली होती. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्यात आला. या प्रयत्नांना आता प्राथभिक स्वरूपात यश मिळत असून, प्रकल्पासाठी प्रस्तावित जागेचा शासकीय सर्व्हे व मोजणी करण्यात आली आहे. दिघोडे येथे प्रस्तावित सबस्टेशनच्या जागेची मोजणी करताना उपस्थित मान्यवर व अधिकारी दिघोडे येथे प्रस्तावित सबस्टेशनच्या जागेची मोजणी उरण भूमिअभिलेख विभागाच्या कर्मचारी सलोनी हिंदोळे आणि वीज वितरण विभागाचे अभियंता किसन गायकवाड यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर, कुंदा ठाकूर, नितीन किसन वाणी, अमित पाटील, प्रमोद शेळके, विशाल पाटील, आस्मक पाटील, आस्मक पाटील, मयूर पाटील, दीपक दीपक नाईक, जयप्रकाश घरत यांच्यासह भूमिअभिलेख उपस्थित होते.

शांतिवनात शिलाई मशिनचे वाटप

। पनवेल । प्रतिनिधी ।

कुष्ठरोग निवारण समिती संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्राच्या शांतिवन प्रकल्पात इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थ आयलँडतर्फे सात शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. यावेळी कुष्ठरोग निवारण समितीच्या स्वीकृत सदस्या तसेच मणीभवन गांधी संग्रहालयाच्या ट्रस्टी फाल्गुनी मेहता उपस्थित होत्या.

शांतिवनातील निवासी महिला कार्यकर्तींना या शिलाई मशिन देण्यात आल्या आहेत. या मशिनच्या माध्यमातून महिलांना



शिवणकाम करून उत्पन्न मिळवता येणार असून, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्राच्या प्रकल्पक्षेत्रात आणि शांतिवन परिसरातील गरजू महिलांना आतापर्यंत विविध संस्था व दानशूरांच्या सहकार्याने एकूण ३५ शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थ आयलँडच्या १४, इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊनच्या ३, इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खारच्या ५, झोनटा क्लब ऑफ बॉम्बेच्या ५, साधु वासवानी मिशनच्या ३ आणि फ्रेनी पाघडिवाला ट्रस्टच्या ५ शिलाई मशिनचा समावेश आहे.

खोपटा पूल वाहतुकीसाठी खुला

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहर, जेएनपीए बंदर आणि उरण पुर्व विभागातील गावे प्रकल्प यांना जोडणाऱ्या जुन्या खोपटा पूलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून वाहतुकीसाठी खुला झाला असल्याने ॲड सत्यवान भगत यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

उरण शहर, जेएनपीए बंदर आणि उरण पुर्व विभागातील गावे प्रकल्प यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या जुन्या खोपटा पूलावर सातत्याने प्रवाशी वाहतूक व अवजड वाहनाची वर्दळ वाढल्याने सदरच्या पुलाची दुरवस्था झाली होती. त्यामुळे वाहतूक कोंडी, अपघातांची समस्या निर्माण होत असल्याने पुलाच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घ्यावे, यासाठी ॲड भगत यांनी माजी आ. मनोहर भोईर, संतोष ठाकूर, बी.एन बाकी, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी अनेक वेळा आंदोलन करून मागणी केली होती. सध्या या पुलाचे काम पूर्ण झाले आहे. दिपावलीच्या मुहूर्तावर वाहतूकीसाठी खुला झाला आहे. एकंदरीत सातत्याने होणारी वाहतूक कोंडीतून प्रवासी नागरिकांना काही अंशी सुटका होणार असल्याने पुलाच्या दुरुस्तीसाठी सहकार्य करणाऱ्या लोकप्रतिनिधी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

सामूहिक फराळ कार्यक्रमाचे आयोजन

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

दिवाळीचा आनंद द्विगुणित करत सामाजिक एकोपा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम रानवली ग्रामपंचायतीने राबविला. ङ्गमुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानफ अंतर्गत जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावलेल्या ग्रामपंचायतीच्यावतीने सोमवारी दिवाळीनिमित्त सामूहिक फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विविध जाती-धर्मांतील ३०० हून अधिक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली.



दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण आहे. हा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. जात, धर्म, पंथ यांचे भेद बाजूला ठेवून आपण सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. गावाचा सर्वांगीण विकास साधताना सामाजिक सलोखा टिकवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमांमुळे आपुलकी वाढते आणि पुढील पिढीसमोर एकतेचा आदर्श निर्माण होतो. यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजू जाधव, विठोबा हावरे, अताउल्ला जालगावकर, बाळकृष्ण गोरनाक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

रायगड जिल्ह्यावर पाणीकपातीचं संकट

धरणांमध्ये ४३ आणि ५४ टक्के, आणखी दोन धरणांमध्ये ७४ आणि ७९ टक्के पाण्याचा साठा असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. श्रीवर्धनमधील रानीवली धरणात ४३ टक्के, तर कार्ले धरणात ५४ टक्के जलसाठा शिल्लक आहे. त्यामुळे जूनपर्यंत जलसाठा पुरविण्याचे संकट निर्माण झाले आहे.

बोरघाटात मृत्यूचा थरार

ट्रकचालक गोविंद रामनाथ भारती हा पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. हा ट्रक बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत आला असता रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या सुमन मोतीराम चव्हाण (५०) या महिलेला ट्रकची जोरदार धडक बसली. या धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. महिलेला धडक दिल्यानंतर चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने या ट्रकने पुढे जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यानंतर टायर फुटल्यामुळे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरलाही जोरदार धडक बसली. त्यामुळे तीन वाहनांचा भीषण अपघात घडला. या अपघातात ट्रकचालक गोविंद भारती यांच्यासह विजय कटारिया आणि रितेश कटारिया हे तिघे जण किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट महामार्ग पोलीस आणि हेल्प फाऊंडेशनचे सदस्य तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढून पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, अपघातग्रस्त तिन्ही वाहनांना क्रेनच्या साहाय्याने रस्त्याच्या बाजूला हटविण्यात आले. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली. या अपघातामुळे बोरघाटातील महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

महेंद्र थोरवे आमदारकीचा राजीनामा द्या

विरोधी पक्षातील नेत्यांना शुभेच्छा देण्याऐवजी बिनबुडाचे आरोप केले. मतदारसंघाचे प्रथम नागरिक असलेल्या आमदारांची ही भूमिका योग्य नाही. त्यांच्या वक्तव्यांमधून विकृत मानसिकता दिसून येते, अशी टीका घारे यांनी केली.

पुढे बोलताना त्यांनी, आमदार अनिकेत तटकरे हे मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आले होते. त्यानंतरची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादीच्या एबी फॉर्मवर लढविण्यात आली होती. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांमुळेच ही निवडणूक बिनविरोध झाली. मात्र, आमदार थोरवे यांना एकनाथ शिंदे यांच्यापेक्षाही आपण मोठे नेते असल्याचा समज झाला आहे, अशी बोचरी टीकाही घारे यांनी केली. कर्जत मतदारसंघात यापूर्वी अनेक आमदार होऊन गेले; मात्र, कोणीही हुकूमशाही गाजवली नाही. सध्याच्या आमदारांकडून मात्र हुकूमशाहीची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मतदारसंघातील कथित गुंड प्रवृत्ती ठेचून काढण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कारने पोलिसाला फरफटत नेले

सीसीटीव्ही फुटेज तपासून कारचा माग काढण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, नाकाबंदीदरम्यान पोलिसांनाच लक्ष्य करून आरोपी पसार झाल्याने कळंबोली परिसरात या घटनेची चर्चा सुरू आहे. जखमी पोलीस कर्मचाऱ्याची प्रकृती आणि आरोपींचा शोध याकडे आता लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात भाऊबीज उत्साहात

बहिणीने पारंपारिक पद्धतीने भावांचे औक्षण केले. त्यानंतर एकमेकांनी दिर्घ आयुष्यासाठी, सुख समृद्धीसाठी प्रार्थना केली. त्यामुळे या निमित्ताने जिल्ह्यात एक वेगळा उत्साह पहायवास मिळाला. तसेच, जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठांमध्ये भाऊबीजेनिमित्त मिठाई, कपडे आणि भेटवस्तू खरेदीसाठी सकाळपासूनच नागरिकांची मोठी लगबग पाहायला मिळाली. कपडे खरेदीसह विद्युत उपकरणे, मिठाई इत्यादी खरेदीचा देखील उत्साह दिसून आला.

टोरंटसाठी सरकारच्या पायघड्या

राज्यातील सताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि सर्व विरोधी पक्ष या आंदोलनात उतरले आहेत. त्यामुळे या प्रकल्पाबाबत आता सरकार नरमाईची भूमिका घेईल असे बोलले जात आहे; परंतु, टोरंट पॉवर कंपनीसाठी पायघड्या घालण्याचे काम सरकारने सुरूच ठेवले आहे. धरण परिसरातील जमीन आणि येथील वीज प्रकल्पात तयार होणारी वीज राज्यभर पोहचवण्यासाठी ट्रान्समिशन लाइन फिरवली जाणार आहे. या जमिनीचे सर्वेक्षण करण्याच्या हालचाली शासनाने सुरू केल्या आहेत. कर्जत सर्वेक्षणासाठी आलेले कामगार जमीन मोजणीची कामे करण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती स्थानिकांनी शिवसेना ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख बाजीराव दळवी यांच्या कानावर घातली. दळवी यांनी तत्काळ सायडोंगर गाठून जमीन सर्वेक्षण साठी आलेल्या कामगारांना तेथून पिटाळून लावले. सायडोंगर परिसरात सर्वेक्षणाचा प्रयत्न करणारे संबंधित कामगाराने आपले नाव बबलू अहिरवार (मध्य प्रदेश) असल्याचे सांगितले. दिल्लीतील एका कंपनीच्या माध्यमातून हायटेन्शन वीजवाहिनीच्या सर्वेक्षणासाठी आले होते. यावेळी बाजीराव दळवी यांच्यासह अन्य शिवसैनिक यांनी त्यांना सुनावले आणि तेथून पिटाळून लावले.

जंगलात वन कर्मचारी बंदोबस्तासाठी नेमलेले आहेत. त्यांच्या निदर्शनास सर्व्हेसाठी आलेले असे कुणी आढळले नाहीत. कदाचित ते जंगलापर्यंत पोहोचले नसतील आणि त्यामुळे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना दिसले नाहीत.

– समीर शिंदे, वनक्षेत्रपाल, कर्जत पूर्व विभाग

सायडोंगर परिसराची पाहणी करून परतत असताना दोन कर्मचारी सर्वेक्षणाचे साहित्य घेऊन जाताना दिसले. चौकशी केली असता या भागातून हायटेन्शन वीजवाहिनी जाणार असून, त्यासाठी सर्वेक्षण करीत असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या या परिसरातील वृक्षतोड थांबवण्यात आली असून, प्रकल्पाबाबत कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही त्यांना सर्वेक्षण करण्यास मज्जाव केला.

– बाजीराव दळवी, तालुका प्रमुख, शिवसेना ठाकरे गट

हजारो दिव्यांनी उजळला इतिहास

यांना मानवंदना देण्यात आली. अलिबाग मधील शेकडो तरुणांच्या उपस्थिती मध्ये हा सोहळा मोठ्या आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी रघुजीराजे आंग्रे व अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे उपस्थित होते. पुढील वर्षी वसुबारस यादिवशी कुलाबा किल्ल्यात शेकडो मशाली प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा होईल, असे आश्वासन सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजी राजे आंग्रे यांनी दिले.

ठेकेदारांची दिवाळी अंधारात

लिटर पाणी मिळण्याचा दिखावा केंद्र सरकारने केला. परंतु, जिल्ह्यातील ६०० हून अधिक योजना निधी अभावी रखडल्या आहेत. योजनांची कामे रखडल्याचा प्रश्न गंभीर असताना जिल्ह्यातील १८५ ठेकेदारांच्या कामांचे १३९ कोटी रुपयांचे वेतन जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागात थकीत असल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या दोन वर्षापासून हे ठेकदार त्यांच्या कामांचे पैसे मागत आहेत. मात्र, निधी नसल्याचे कारण सांगितले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. कामाचे पैसे मिळाले नसल्याने जिल्ह्यातील १८५ ठेकेदारांची दिवाळी अंधारात गेल्याचे सांगण्यात आले आहे. प्रशासन व शासनाच्या उदासीनतेचा फटका ठेकेदारांना बसल्याचे ते म्हणाले. कामांचे थकीत बिल मिळत नसल्याने ठेकेदारांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. उदारीवर कामासाठी घेतलेल्या साहित्यांचे पैसे देता येत नाही. कामगारांची मजूरी थकली आहे. त्यामुळे शासनाने याची दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

दरीत कोसळून युवकाचा मृत्यू

आवश्यक प्रशिक्षण नव्हते. अशा परिस्थितीत धोकादायक ठिकाणी चढाई करण्याचा प्रयत्न जीवावर बेतला. याचवेळी शाहिद अन्सारी याचा तोल जाऊन तो सुमारे ४५० फूट खोल दरीत कोसळला. घटनेची माहिती मिळताच पौड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. युवकाचा शोध घेण्यासाठी रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. खोल दरी, दुर्गम परिसर आणि आव्हानात्मक परिस्थिती अशा अडचणींचा सामना करत बचाव पथकाने शोधमोहीम सुरू केली. सुमारे दीड तासांच्या अथक प्रयत्नांनंतर शाहिदचा मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात यश आले. या घटनेचा पुढील तपास पौड पोलीस करीत आहेत.

ताम्हिणी घाटातील धबधबे, दऱ्या आणि निसर्गरम्य परिसर पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. मात्र, याच सौंदर्याच्या मोहात पडून सुरक्षिततेचे नियम दुर्लक्षित करणे किती महागात पडू शकते, याची जाणीव या दुर्घटनेने पुन्हा एकदा करून दिली आहे. सेल्फी, फोटो, साहसी चढाई किंवा थरारच्या नादात धोकादायक कड्यांवर जाणे टाळावे. विशेषतः गिर्यारोहणाचे प्रशिक्षण आणि आवश्यक सुरक्षा साधने नसताना अशा ठिकाणी जाणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणीच पर्यटनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. एका क्षणाचा अतिउत्साह संपूर्ण कुटुंबाचे आयुष्यभराचे दुःख बनू शकतो. पर्यटनासाठी घराबाहेर पडताना आनंदाच्या आठवणी घेऊन परतावे, जीवघेण्या आठवणी नव्हे! शाहिदच्या दुर्दैवी मृत्यूने पुन्हा एकदा पर्यटनस्थळांवरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

१०० फूट खोल कोसळला युवक

करावे लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, फटाके फोडण्यासाठी उड्डाणपुलावर गेलेला युवक अचानक खाली पडला. याची माहिती मिळताच अग्निशमन दलाची दोन वाहने तातडीने घटनास्थळी दाखल झाली. सुरुवातीला युवक ५० ते ६० फूट खाली पडल्याची माहिती मिळाली होती. मात्र, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान तो सुमारे १०० फूट खोल असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बचावकार्य अधिक आव्हानात्मक बनले. घटनास्थळाची परिस्थिती आणि बचावकार्याची जोखीम लक्षात घेऊन अतिरिक्त साहित्य व मनुष्यबळ मागविण्यात आले. उड्डाणपुलाखाली युवक ज्या ठिकाणी पडला होता, तेथे पोहोचण्यासाठी दोन जवानांना सुमारे दीड किलोमीटर अंतर पायी पार करावे लागले. त्यानंतर तीन दोरखंड, बॉडी हार्नेस, हेल्मेट आणि टॉर्चच्या साहाय्याने बचावकार्य सुरू करण्यात आले. जवानांनी नियोजनबद्ध पद्धतीने युवकाला दोरखंडाच्या मदतीने सुरक्षितपणे वर आणले. शिवांश दामले असे या युवकाचे नाव असून तो जुने पनवेलमधील लाईन आळी परिसरातील रहिवासी आहे. सुटकेनंतर त्याला तातडीने रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. या बचाव मोहिमेत उपअग्निशमन केंद्र अधिकारी शुभम राठोड, प्रमुख अग्निशमन विमोचक शिवा आडे, यंत्रचालक आकाश नलवडे, शिवलाल अलदर तसेच अग्निशामक शुभांगी घुले, शंकर वाकडे, विक्रांत सपकाळ, सुनील मोरे, प्रीतम पाटील, निकितेश डुकरे आणि प्रणय म्हसकर यांनी सहभाग घेतला.

निवडक



मटणाच्या दुकानांबाहेर गर्दी

खांदा कॉलनी : भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सण म्हणजे भाऊबीज या सणानिमित्त बुधवारी (दि.११) रोजी पनवेल शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत होते. भाऊबीजेला लाडकी बहीण माहेरी येणार असल्याने तिच्या स्वागतासाठी भावांची सकाळपासूनच लगबग सुरू झाली होती. बहिणीच्या आगमनानिमित्त घराघरांत गोडधोड पदार्थांसह खास जेवणाची तयारी केली जात आहे. त्यात मटणाच्या बेताला विशेष पसंती मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. पनवेलमधील मटणाच्या दुकानांसमोर सकाळपासूनच ग्राहकांच्या मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. मटणाचे दर वाढलेले असले, तरी त्याची पर्वा न करता ग्राहकांनी खरेदीसाठी गर्दी केली. किलोमागे कितीही पैसे मोजावे लागले, तरी वर्षातून एकदा येणाऱ्या या सणाला बहिणीचा पाहुणचार करण्यात कोणतीही कसर नको, अशी अनेक भावांची भावना होती. काही जणांनी आधीच मटणाची ऑर्डर दिली होती, तर काही जण दुकानांबाहेर रांगेत उभे राहून आपला नंबर येण्याची वाट पाहत होते. बाजारपेठेतही भाजीपाला, मसाले आणि इतर खाद्यपदार्थांच्या खरेदीसाठी नागरिकांची वर्दळ वाढली होती.लहानपणीच्या आठवणी, भावंडांच्या गप्पा, बहिणीचे औक्षण आणि एकत्र बसून घेतलेला जेवणाचा आनंद यामुळे भाऊबीजेचा सण अधिक खास ठरतो. महागाईच्या काळातही नात्यांमधील गोडवा मात्र कमी झालेला नाही, याचीच प्रचिती पनवेलमधील मटणाच्या दुकानांबाहेरील गर्दीतून आली. मटण कितीही महाग असो, बहिणीचा पाहुणचार मात्र दणक्यातच होणार आहे.



रामदास कदमांच्या विरोधात घोषणाबाजी

रोहा : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या विषयी शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी खालच्या पातळीवर जाऊन केलेल्या बेताल वक्तव्याचा रोहा शहर व तालुका राष्ट्रवादीकडून निषेध करण्यात आला. कदमांच्या वक्तव्यानंतर संतापलेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी कदमांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मंगळवारी सायंकाळी राम मारुती चौक येथे कदम यांचा जाहीर निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते जमा झाले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, विजया पाशिलकर, नगराध्यक्षा वनश्री शेडगे, समीर शेडगे, ॲड.मनोज कुमार शिंदे, मयुर दिवेकर, रविंद्र चाळके, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, समीर सकपाळ, अजित मोरे, महेश सरदार, दिवेश जैन, नितीन पिंपळे, महादेव साळवी, मिलिंद पिंपळे, प्रेषित बारटक्के, मयुर खैरे, स्वप्नील धनावडे, निलेश शिर्के, हर्षद साळवी आदी शेकडो जण विशेषतः महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

खोपोली पोलिसांची अनोखी भेट

खोपोली : दिवाळी म्हणजे आनंदाची देवाणघेवाण आणि भेटवस्तूंची बरसात. मात्र, एखाद्याची हरवलेली जिव्हाळ्याची वस्तू पुन्हा त्याच्या हाती देण्याचा आनंद काही औरच असतो. खोपोली पोलिसांनी याच भावनेचा प्रत्यय देत हरवलेले तसेच चोरीला गेलेले तब्बल ३० मोबाईल फोन शोधून ते त्यांच्या मूळ मालकांना परत केले. विशेष म्हणजे हे सर्व अँड्रॉइड आणि स्मार्टफोन होते. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर पुन्हा हाती आलेल्या आपल्या मोबाईलमुळे संबंधित नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान पाहण्यासारखे होते. अनेकांसाठी ही केवळ मोबाईल परत मिळण्याची घटना नव्हती, तर हरवलेल्या आठवणी, महत्त्वाचे दस्तऐवज आणि जिव्हाळ्याचा ठेवा पुन्हा मिळाल्याचा सुखद अनुभव होता. खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ झालेल्या तसेच चोरीला गेलेल्या मोबाईल फोनबाबत प्राप्त तक्रारींच्या आधारे ही विशेष शोधमोहीम राबविण्यात आली. रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि खालापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वात ही मोहीम यशस्वी करण्यात आली.

मोहोपाड्यातून अल्पवयीन बेपत्ता

रसायनी : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे शिवनगर, मोहोपाडा येथून १६ वर्षे ३ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी मुलीच्या पालकांनी मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती अज्ञात इसमाने तिला कायदेशीर पालकांच्या ताब्यातून फूस लावून पळवून नेल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मपोसई अनुसया ढोणे करीत आहेत.

माणगाव शहर वाहतूक कोंडीच्या विळख्यात

पर्यटन हंगामामुळे लांबच लांब रांगा, बायपास रखडल्याचा स्थानिकांना फटका

। माणगाव । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव शहराला वाहतूक कोंडीचा शाप काही केल्या सुटण्याचे नाव घेत नाही. बहुचर्चित माणगाव बायपास अद्याप वाहतुकीसाठी खुला न झाल्याने दिवाळी सण, सलग सार्वजनिक सुट्ट्या आणि कोकणातील पर्यटन हंगामाच्या पार्श्वभूमीवर शहर पुन्हा एकदा वाहनांच्या गर्दीने गुदमरले आहे. गेल्या चार दिवसांपासून महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, पर्यटक आणि प्रवाशांचा प्रवास संथ झाला आहे. मात्र या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक त्रास माणगावच्या स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे.



सोमवारी (दि.९नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून शहरात खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यातच महामार्गावरील वाहनांची वाढती वर्दळ आणि शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील रहदारी यांचा एकत्रित परिणाम होऊन ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी निर्माण झाली. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, पादचाऱ्यांनाही रस्त्यावरून मार्ग काढणे कठीण झाले होते.

माणगाव शहरापासून ढालघर फाट्यापर्यंत तसेच माणगाव ते कोशिंबेपर्यंत वाहनांच्या दुतर्फा लांबच लांब रांगा लागल्या होत्या. शहरात येणाऱ्या आणि शहराबाहेर जाणाऱ्या दोन्ही मार्गांवर वाहनांच्या दोन ते तीन रांगा तयार झाल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता.

दुचाकी, चारचाकी, खासगी प्रवासी वाहने, अवजड वाहने आणि पर्यटकांच्या वाहनांची मोठी गर्दी झाल्याने रस्त्यावरून मार्ग काढताना वाहनचालकांची अक्षरशः दमछाक झाली.

रस्त्यावर तासन्तास वाहने अडकून पडल्याने प्रवासाचा वेळ वाढत असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रचंड गर्दीमुळे काही ठिकाणी किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत आहेत.

घाईघाईने ओव्हरटेक करणे, वेगाने वाहने चालविणे आणि वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे यामुळे वाहनचालकांमध्ये छोटे-मोठे वाद निर्माण होत आहेत. काही ठिकाणी वादामुळे वाहने रस्त्यातच थांबवली जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा आणखी वाढत आहे.

पोलिसांच्या कारवाईमुळे दिलासा

वाहतूक कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी माणगाव पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. बेदरकारपणे वाहने चालविणारे, वाहतुकीचे नियम मोडणारे तसेच रस्त्याच्या मधोमध वाहने थांबवून अडथळा निर्माण करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. पोलिसांच्या या हस्तक्षेपामुळे काही प्रमाणात वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असली, तरी वाहनांची प्रचंड संख्या लक्षात घेता कोंडीची समस्या पूर्णपणे सुटलेली नाही.

बायपास कधी सुरू होणार?

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी ही काही आजची समस्या नाही. मुंबई-गोवा महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांचा वाढता भार अनेक वर्षांपासून शहरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. शहरातील अरुंद रस्ते, बाजारपेठेतील गर्दी आणि महामार्गावरील वाढती वाहनसंख्या यामुळे प्रत्येक सणासुदीला माणगावकरांना वाहतूक कोंडीच्या संकटाला सामोरे जावे लागते.

हरिहरेश्वर येथील स्वच्छतागृहाची दुरावस्था

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ असलेल्या दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे पर्यटकांच्या सुविधांसाठी उभारण्यात आलेल्या सुलभ शौचालयाची दुरवस्था झाली असून, ते बंद अवस्थेत असल्याने भाविक आणि पर्यटकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत प्रदक्षिणा मार्गावर उभारण्यात आलेल्या या शौचालयाची देखभाल आणि स्वच्छतेअभावी सध्या अत्यंत बिकट अवस्था झाली आहे.



■ शौचालय परिसरात कचऱ्याचे ढीग

शौचालय परिसरात कचऱ्याचे ढीग, प्लास्टिकच्या पिशव्या आणि रिकाम्या बाटल्यांचा खच पडला आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या या स्थळाच्या सौंदर्यालाच बाधा पोहोचत आहे. शौचालयांची दारे, खिडक्यांची तावदाने गायब झाली असून पाण्याची टाकीही खराब अवस्थेत आहे. पाणीपुरवठ्याची व्यवस्था नसल्याने शौचालय वापरणे अशक्य झाले आहे.

हरिहरेश्वर येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक, पर्यटक दर्शनासाठी येतात. मात्र, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आणि बसण्यासाठी आसनव्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह येणाऱ्या पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे. पर्यटनवाढीसाठी विकासकामे केली जात असताना उभारण्यात आलेल्या सुविधांची देखभाल होत नसल्याने पर्यटकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाने या शौचालयाची तातडीने दुरुस्ती करून नियमित स्वच्छतेची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

> हरिहरेश्वर येथे मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक येतात. मात्र, मूलभूत सुविधांचा अभाव आहे. बंद अवस्थेतील सुलभ शौचालयाची प्रादेशिक पर्यटन विकास विभागाने तातडीने दुरुस्ती करून ते हरिहरेश्वर ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावे. त्यामुळे भविष्यात त्याची योग्य देखभाल होऊ शकेल.
> – अमित खोत
> माजी सरपंच, हरिहरेश्वर.

म्हसळा ग्रामीण रुग्णालयातील सेवा ठप्प

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा ग्रामीण रुग्णालयात मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात डायलिसिस केंद्राचे उद्घाटन करण्यात आले होते. मात्र, उद्घाटनानंतर काही काळातच डायलिसिस सेवा बंद पडल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

म्हसळा तालुक्यातील गरीब व सर्वसामान्य रुग्णांसाठी ही सेवा मोठा आधार ठरली होती. मात्र, सेवा बंद झाल्याने डायलिसिससाठी रुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे. खासगी रुग्णालयातील डायलिसिसचा खर्च सर्वसामान्य रुग्णांना परवडणारा नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

डायलिसिससारखी अत्यावश्यक आरोग्यसेवा सुरू करून त्यात सातत्य राखणे गरजेचे असताना सेवा बंद होणे ही गंभीर बाब आहे. प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन डायलिसिस सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी शेकापचे नेते संतोष पाटील यांनी केली आहे.

रुग्णांना दिलासा देण्यासाठी सेवा तातडीने सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतोष पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आलेले डायलिसिस केंद्र पुन्हा कधी सुरू होणार, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शेकाप नेते संतोष पाटीलांचा आंदोलनाचा इशारा

माणगावमध्ये धूलिकणांत वाढ

। माणगाव । प्रतिनिधी ।

निसर्गाचे वरदान लाभलेला रायगड जिल्हा आज वाढत्या प्रदूषणाच्या समस्येला सामोरा जात आहे. दिवाळीतील फटाक्यांची आतषबाजी, मुंबई-गोवा महामार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडी, अपूर्ण रस्ते बांधकामातून उडणारी धूळ, वाढते नागरीकरण आणि औद्योगिक प्रदूषण यामुळे माणगावसह जिल्ह्यातील पर्यावरणावर ताण निर्माण होत आहे.

विकासाच्या धावपळीत स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि निसर्गसंपदेचे संवर्धन मागे पडत असल्याची चिंता पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या मोठ्या प्रमाणातील आतषबाजीमुळे हवेत धूर आणि सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढते. यामुळे श्वसनसंस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होण्याची शक्यता असते. रात्री उशिरापर्यंत वाजणाऱ्या मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे ध्वनीप्रदूषणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सण साजरा करताना पर्यावरण आणि आरोग्याचे भान राखणे आवश्यक बनले आहे.

श्रीवर्धन पर्यटकांनी हाउसफुल्ल

श्रीवर्धन : दिवाळीची सुट्टी असल्यामुळे श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढली आहे. तालुक्यातील समुद्रकिनारे दिवसेंदिवस पुणे, पश्चिम महाराष्ट्र, अहिल्यानगर या परिसरातील पर्यटकांना मोठी भुरळ घालत आहेत. श्रीवर्धन समुद्रकिनारा, हरिहरेश्वर, आरावी त्याचप्रमाणे दिवेआगर समुद्रकिनारा पर्यटकांनी हाउसफुल्ल झाल्याचे पाहायला मिळत आहे. समुद्रकिनाऱ्यावरती असणारे वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेण्यासाठी देखील पर्यटकांनी खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे.

लक्ष दिव्यांनी उजळले सिद्धगड

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या सिद्धगड मुरबाड येथील समाधी स्थळी दिवाळीनिमित्त एक दीप शहिदांसाठी हा कार्यक्रम राबविला. हुतात्म्यांच्या पावन भूमीत शेकडो देशप्रेमी तरुणांनी जगवली. दिवाळी पाडव्याची रात्र देशभक्तीपर भाषणांनी जगवली. तर रात्रीच्या अंधारात जागर त्या ठिकाणी पाहायला मिळाला. शेकडो दिव्यांनी सिद्धगड येथील दोन्ही हुतात्म्यांचे समाधी स्थळ उजळून निघाले. यावेळी लहान मुलांनी क्रांतीचा जयजयकार करणारी भाषणे केली. तर शाहिरांनी पोवाडे सादर केले.



हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांनी देशाच्या क्रांतीच्या लढ्यात आघाडीवर राहणारे क्रांतिकारकांना एक दीप शहिदांसाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

जांभुर्डे ग्रामस्थांच्या हरिपाठ मंडळाने हरिपाठ सादर केला. याप्रसंगी मुरलीधर दळवी, दीपक खातेघरे, महेंद्र पवार, ॲड राजेंद्र येरूनकर, संतोष पेरणे, धोंडू राणे, बाजीराव दळवी, ॲड रंजना धुळे, तसेच शेकडो तरुण उपस्थित होते.

जेएनपीए परिसरात वाहतूक कोंडी

उरण: जेएनपीए बंदर परिसरातील एम्प्टी कंटेनर याड्र्समध्ये गेल्या काही दिवसांपासून वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, येथील याड्र्सबाहेर १२ ते २४ तासांपर्यंत लांबच लांब ट्रॅफिक जाम लागत असल्याचे चित्र समोर आले आहे. या भीषण वाहतूक कोंडीमुळे कंटेनर चालक, मालवाहतूकदार व सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

रोह्याची जीवनवाहिनी कुंडलिका प्रदूषित

। रोहा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात एका बाजूला भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्यासाठी शासन नागरिकांना 'पाणी जपून वापरा' असा सल्ला देत आहे. मात्र, दुसरीकडे बारा महिने वाहणाऱ्या व रोहा तालुक्याची जीवनवाहिनी मानली जाणारी पवित्र कुंडलिका नदी प्रदूषित होत असताना दिसत आहे.या गंभीर विषयाकडे संबधित प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने नदी



अक्षरशःअस्वच्छ आणि प्रदूषित झाली आहे.

रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेऊन टाकाऊ घाण नदी पात्रात टाकण्याचे प्रकार सतत होत असल्यामुळे व औद्योगिक प्रदूषणांमुळे ही नदी आता मनाल्याच्या स्वरूपातफ बदलत असून संतप्त नागरिकांमधून आता प्रशासनाविरोधात रोष व्यक्त होत आहे.

रोहे शहरातील काही बेजबाबदार चिकन मटण विक्रेत्यांकडून शहराची आणि पर्यावरणाची विटंबना सुरू आहे. चिकन दुकानांमधील घाण, कोंबड्यांची पिसे, पाय, रात्रीच्या अंधारात थेट कुंडलिका नदीत फेकून दिली जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. एका बाजूला तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळ असताना उपलब्ध जलस्त्रोतांत दुर्गंधी पसरविण्याचा प्रकार खुलेआमपणे होत असतानाही स्थानिक प्रशासन गांभीर्याने पावले उचलताना दिसत नाही.

> कुंडलिका नदी रोहेकर जनतेसाठी वरदान असून नदी दूषित करण्याचे प्रकार सर्रासपणे घडत आहेत.दोषी अधिकाऱ्यांवर संबधित प्रशासनाने कठोर कारवाई करून नदी स्वच्छ सुंदर आणि प्रदूषणमुक्त करावी.
> –शैलेश रावकर

कामांसाठी अलिबागला जाणाऱ्यांची गैरसोय | अनेक वर्षे आगार उत्पन्नात अग्रेसर

श्रीवर्धन-अलिबाग बससेवा बंद

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन आगाराच्या स्थापनेपासून सुरू असलेली श्रीवर्धन-अलिबाग बससेवा बंद करण्यात आल्याने तालुक्यातील प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक वर्षे आगाराच्या उत्पन्नात अग्रेसर असलेली बससेवा बंद करण्यात आली आहे. मात्र, या निर्णयामुळे शासकीय कामांसाठी अलिबागला जाणाऱ्या नागरिकांसमोर वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे.



अलिबाग हे जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांचे मुख्यालय असल्याने श्रीवर्धन तालुक्यातील शासकीय कर्मचारी तसेच विविध शासकीय कामांसाठी अलिबाग येथे जाणाऱ्या नागरिकांसाठी ही बससेवा अत्यंत उपयुक्त होती. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या सेवेमुळे प्रवाशांना सोयीस्कर प्रवास करता येत होता. मात्र, बससेवा बंद झाल्याने नागरिकांना खासगी वाहनांचा किंवा अन्य पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत आहे.

विशेष म्हणजे, प्रवासी वर्गाकडून बससेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी झाल्यानंतर काही दिवसांसाठी बस सुरू केली जाते. मात्र, प्रवाशांचा पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याचे हास्यास्पद कारण देत पुन्हा ही सेवा बंद केली जाते, तर कधी चालक-वाहकांची कमतरता असल्याचे कारण पुढे केले जाते. त्यामुळे ही बससेवा कायमस्वरूपी सुरू ठेवण्याबाबत एसटी प्रशासनाची भूमिका काय, असा प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, श्रीवर्धन आगारातील चालक आणि वाहकांच्या कमतरतेमुळे बसफेऱ्यांच्या नियोजनावर परिणाम होत असल्याचा खुलासा आगार व्यवस्थापनाकडून करण्यात आला आहे. आगारात चालक आणि वाहकांची मंजूर पदे प्रत्येकी ११६ अशी एकूण २३२ असताना प्रत्यक्षात केवळ १८० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे तब्बल ५२ चालक-वाहकांची कमतरता भासत आहे. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून डबल ड्युटीचे नियोजन करूनही अनेक बसफेऱ्या उशिरा सोडाव्या लागतात किंवा रद्द कराव्या लागतात. कर्मचारी कमतरतेमुळे ही परिस्थिती उद्भवत असल्याचे आगार व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे.

> अनेक वर्षांपासून सुरू असलेली श्रीवर्धन-अलिबाग बससेवा नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. शासकीय कामांसाठी अलिबागला जाणाऱ्या आम्हा प्रवाशांना या सेवेचा मोठा आधार होता.त्यामुळे प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने ही बससेवा नियमित सुरू करावी.
> – हरिदास वाघे
> प्रवासी, श्रीवर्धन.

मुरूडमध्ये पर्यटकांची तुफान गर्दी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

दिवाळी पाडव्याच्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी मुरूड तालुक्याकडे मोठ्या प्रमाणावर धाव घेतली असून तालुक्यातील विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांची तुफान गर्दी पाहायला मिळत आहे. मुरूड तालुका हा रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचा पर्यटन तालुका म्हणून ओळखला जातो. येथील काशीद, चिकणी, नांदगाव, मुरूड समुद्रकिनारा, ऐतिहासिक जंजिरा किल्ला, खोकरी येथील ऐतिहासिक वास्तू, दत्त मंदिर, गारंबी तसेच सुपेगाव येथील अभयारण्य या पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी रेलचेल सुरू आहे. समुद्रकिनाऱ्यांचा आनंद लुटण्यासह ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांना भेट देण्यासाठी पर्यटकांची विशेष पसंती मुरूडला मिळत आहे.

पर्यटकांच्या वाढत्या गर्दीचा सकारात्मक परिणाम स्थानिक पर्यटन व्यवसायावर दिसून येत आहे. शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि लॉजिंग पूर्णपणे हाऊसफुल्ल झाले आहेत. त्याचबरोबर घरगुती खानावळींनाही जेवणाच्या मोठ्या प्रमाणात ऑर्डर मिळत असून खानावळ चालकांची चांगलीच धावपळ सुरू आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे मुरूड तालुक्यात पर्यटन हंगामाला चांगली सुरुवात झाली आहे.

हिंदूराष्ट्रातील धूर

भारत हे हिंदूराष्ट्र आहे असे मोहन भागवतांपासून सर्व जण सांगत असतात. संघाचे प्रचारक असलेले नरेंद्र मोदी बारा वर्षे सत्तेत आहेत. जनता त्यांना सतत निवडून देते. म्हणजे जनतेलाही हे हिंदूराष्ट्र आहे याचा आनंद दिसतो. पण या हिंदूराष्ट्रातला सर्वात मोठे जे जे सण आहेत त्यांच्या निमित्ताने गडबडी आणि त्रास वाढलेले दिसतात. नुकत्याच झालेल्या दिवाळीचे उदाहरण घ्या. दिवाळीच्या खरेदीच्या बातम्यांइतक्याच फटाके आणि धूराच्या प्रदूषणाच्या बातम्या दिसतात. यंदा मुंबई आणि परिसरात तर कहर झाला. भारतभरात नुसता धूरच धूर झाला. सगळीकडे एअर क्वालिटी इंडेक्स म्हणजेच एक्यूआयची चर्चा सुरू झाली. जेव्हा हा हवेच्या दर्जाचा निर्देशांक शून्य ते ५० च्या दरम्यान असतो त्याअर्थी हवेत अगदी थोडी धूळ, धूर इत्यादी असतो. कोणत्याही शहरामध्ये वाहनांचा धूर, हॉटेलांमधून बाहेर पडणारा धूर, वाफ, बांधकामांच्या ठिकाणची धूळ हवेत उडणे साहजिक असते. पण लंडन इत्यादी बडी शहरे असूनदेखील व गाड्यांची संख्या भरमसाठ असूनही तेथे एक्यूआय बहुतेकदा या पन्नासच्या मर्यादेत असतो. भारत उर्फ हिंदूराष्ट्रात मात्र याच्या उलट चित्र असते. दिल्लीसारखी शहरे जगातील सर्वाधिक प्रदूषणग्रस्त शहरांमध्ये कायम स्थान पटकावून असतात. मुंबईला समुद्राचा शेजार असल्याने तेथून येणारे वारे प्रदूषणाची पातळी कमी करतात. शिवाय इतक्या वर्षात रेल्वे लोकल गाड्यांच्या सेवेमुळे रस्त्यावरील मोटारींची संख्या कमी होती. लोकल सेवा विजेवर चालतात. त्यामुळे मुंबईतील हवा दिल्लीपेक्षा सुसह्य असे. अगदी गिरण्या व कारखाने असूनही मुंबई दिल्लीहून बरी होती. पण आता हे चित्र उलटेपालटे झाले आहे. यंदा रविवारी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी कहर झाला. दिवाळी नावाच्या हिंदू सणाला हिंदूराष्ट्रातील हिंदूंनी असा काही धमाका केला की जगातील सर्वात प्रदूषणग्रस्त शहरांमध्ये देशातील तब्बल ९३ शहरांचा समावेश असल्याच्या बातम्या आल्या. बहुतेक शहरांमधील एक्यूआय ३०० ते ५०० च्या दरम्यान होता. दिल्लीच्या परिसरात तर तो बाराशेच्याही वर गेला. राजस्थानातील गंगानगरमध्ये तो १५०० च्या वर होता.

वेदांमध्ये फटाके नाहीत

जगण्यासाठी श्वासोच्छवास आवश्यक असतो. पण इतकी प्रचंड प्रदूषित हवा फुफ्फुसात ओढली जात असेल तर माणसे जगण्यासाठी नव्हे तर मरण्यासाठी श्वासोच्छवास करतात असे म्हणावे लागेल. ही स्थिती आजची नाही. पण ती क्रमाक्रमाने वाईट होत चालली आहे. अवघ्या काही तासांमध्ये लाखो माणसे छोट्या जागेत जे फटाके उडवतात त्यामुळे प्रचंड धूर होतो. तो डोळ्यांना दिसतो. त्याचा सर्वांना त्रास होतो. काहींना तर डॉक्टरांचे उपचार घ्यावे लागतात. पण हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेला तेव्हा धुरामुळे त्रास होत असल्याचे ठोस पुरावे आपल्यासमोर आलेले नाहीत असे मत न्यायालयाने व्यक्त केले. म्हणूनच तर त्याने ग्रीन फटाक्यांना परवानगी दिली. अर्थात. न्यायालयाने सम जा बंदी घातली असती तरी ती कितपत मान्य झाली असती हा प्रश्नच आहे. कारण, न्यायालयाने ठराविक दोन तासांचा वेळ फटाक्यांसाठी दिला होता. प्रत्यक्षात रविवारी सर्वत्र रात्री एक ते दोन वाजेपर्यंत फटाके वाजत होते. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडे कोणतीही व्यवस्था नव्हती. ते शक्यही नाही. लाखो लोकांनी एखादा कायदा मोडायचे ठरवले तर हजारांच्या संख्येत असलेले पोलिस त्यांना अडवू शकत नाहीत. नेमक्या याच गोष्टीचा फायदा हिंदूराष्ट्रातील मंडळी घेत असतात. दुसरे म्हणजे फटाके वाजवू नका असे म्हटले की, लगेच यांच्या धर्माचा अपमान होतो. वास्तविक हे सांगणारी मंडळी हिंदूच असतात. ज्यांना धुराचा त्रास होतो तेही ९९ टक्के हिंदूच असतात. त्यातही लहान मुले, वृध्द यांचे प्रमाण मोठे असते. या दोघांनाही जपावे असे अगदी वेदकाळापासून सांगितलेले आहे. मोठ्या माणसांचा आदर करणे ही आपली संस्कृती आहे वगैरे हिंदूंना तोंडपाठ असते. पण फटाके वाजवू नका असे यापैकी कोणीही सांगितले की त्यांना शिव्या दिल्या जातात. मुस्लिम किंवा अन्य धर्मीयांना त्यांच्या सणांच्या वेळच्या चुकीच्या गोष्टींबद्दल कोणी का सांगत नाही असा सवाल केला जातो. हे अत्यंत मूर्ख पण दुष्ट असे तर्कट आहे.

हिंदूंचे लांगूलचालन

या देशात हिंदू बहुसंख्य आहेत. त्यामुळे त्यांच्याच प्रथा, परंपरांची अधिक चर्चा होणे साहजिक आहे. एरवीही हिंदू बहुसंख्य असण्याचे अनेक फायदे आपण घेत असतो. आपल्या कॅलेंडरातल्या ९५ टक्के सुट्या या हिंदूंच्या सणांच्या निमित्ताने आहेत. शिवाय हिंदूंच्या पूजा, हिंदूंचे उत्सव यांचे गुणगान सतत चालू असतेच. दुसरे म्हणजे फटाके किंवा कोणत्याही प्रकारचा उपद्रव कोणाही मुळे होत असेल तर तो वाईटच याबाबत टीकाकारांचे एकमत असते. मुसलमानांमध्ये ईद किंवा अशा कोणत्याही सणाला फटाके वाजवले जात नाहीत वा इतक्या प्रचंड प्रमाणात आवाज आणि धूराचे प्रदूषण केले जात नाही. त्यामुळे त्याविषयी बोलण्याचा प्रसंग येत नाही. ईद किंवा मोहर्ममध्ये काही अनिष्ट गोष्टी असतील किंवा एवी मुस्लिमांमध्ये अज्ञानामुळे काही चुकीच्या गोष्टी होत असतील तर त्यांचाही कोणीही धिक्कारच करील. पण दिवाळीच्या फटाक्यांवर बोलायला लागल्यावर तो विषय बदलून मुस्लिमांचे काय असे विचारणे हे निव्वळ अडाणी गुंडपणाचे लक्षण आहे. परवा लक्ष्मीपूजनाला एकट्या मुंबईत फटाक्यांमुळे वा अन्य कारणांमुळे तब्बल १३७ ठिकाणी आगी लागल्या. प्रसिध्द दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आणि पल्लवी जोशी यांच्या घरात बाण घुसून सोफा पेटला. त्याच्या निषेधार्थ अग्निहोत्री यांनी आधी सोशल मिडियात संताप व्यक्त केला. हे अग्निहोत्री कट्टर हिंदू आहेत. यांच्या काश्मीर फाईल्स सिनेमाची खुद्द पंतप्रधान मोदींनी शिफारस केली होती. पण कट्टर हिंदू अग्निहोत्री यांनी फटाक्यांविरुध्द टीका करताच त्यांच्या अन्य कट्टर हिंदू बांधवांनी त्यांच्यावर टीका केली. फटाके लावणे हा हिंदूंच्या सणाचा भाग आहे वगैरे बडबड झाली. इतकी की अग्निहोत्री यांनी घाबरून म्हणा किंवा लाज वाटून म्हणा आपले ट्विट माघारी घेतले. म्हणजेच शांत डोक्याने वस्तुनिष्ठ विचार करणे हे हिंदूंनी बहुधा आता बंदच केले असावे. उंच हवेत सोडलेले बाण कोणाच्याही घरात घुसून पेट घेतात, आगी लागतात, माणसे भाजतात या भयंकर गोष्टी आहेत. वेदांमध्ये वा हिंदू धर्मग्रंथांमध्ये अशी पेटवापेटवी करावी असे कुठेही म्हटलेले नाही. आणि म्हटले असले तरी ते आजच्या काळात गैर आहे हे कोणाही डोके ताळ्यावर असलेल्या माणसाला कळेल. यात हिंदू किंवा मुस्लिम असा भेद करण्याचे कारण नाही. येत्या काळात शहरे अधिकाधिक कोंदट व गजबजलेली होणार आहेत. परवा रात्री फटाक्यांमुळे आग लागून विरारकडे जाणाऱ्या म ार्गावरची सिग्नल यंत्रणाही पेटली व लोकल यंत्रणा विस्कळित झाली. हे असेच चालू राहिले तर यापुढे याहून भयंकर आणि कल्पनाही करता येणार नाहीत असे अपघात होऊ शकतात. हिंदूराष्ट्रात मोदींसारखे दणकट हिंदू सरकार असताना खरे तर फटाके किंवा प्रदूषणासारख्या वाईट बाबींबाबत त्यांना कडक भूमिका घेणे शक्य व्हायला हवे होते. पण इथे तर उलटेच चालू दिसते. हिंदू खतरे मे असे म्हणून घाबरवणाऱ्या हिंदूंचे लांगूलचालन मोदी, शहा का बरे करीत असावेत?

विचार

कोणी, कसा उमटवला यंदा 'नोबेल'वर ठसा?

आज माणसाला औषधनिर्मिती प्रभावी बनवायची आहे, विश्वातील अनुत्तरित प्रश्न सोडवायचे आहे असून आर्थिक संकटांचा सामना करण्यासाठी सक्षम व्यवस्थाही उभारायची आहे. २०२६ च्या नोबेल पुरस्कारांमधील वैद्यकशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्रातील संशोधन या उद्दिष्टांना दिशा देणारे आहे. या पुरस्कारांचा खरा अर्थ आजच्या संशोधनातून उद्याच्या समाजाची पायाभरणी कशी होते, हे समजून घेण्यात आहे.

जनार्दन पाटील

जगातील मोठे बदल नेहमीच राजकीय घोषणा, आर्थिक योजना किंवा तंत्रज्ञानाच्या बाजारपेठेतील स्पर्धेतून घडतात असे नाही. अनेकदा एखाद्या प्रयोगशाळेत विचारलेल्या साध्या प्रश्नातूनही परिवर्तनाची सुरुवात होते. एखाद्या पेशीचे कार्य कसे नियंत्रित करता येईल, विश्वाच्या दूरस्थ भागांमधून येणाऱ्या सूक्ष्म कणांचा माग कसा काढता येईल, जीवनासाठी आवश्यक असलेल्या रेणूंची विशिष्ट रचना कशी निर्माण होते किंवा अर्थव्यवस्थेतील चढउतार कसे नियंत्रित करता येतील, अशा प्रश्नांमधूनच ज्ञानाची नवी क्षितिजे खुली होतात. २०२६ च्या नोबेल पुरस्कारांनी अशाच मूलभूत प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. या संशोधनांची क्षेत्रे वेगवेगळी असली, तरी त्यांच्यामागे एक समान विचार आहे. दिसणाऱ्या परिणामांवर समाधान न मानता त्यामागील यंत्रणा समजून घेणे आणि त्या ज्ञानाचा उपयोग व्यापक मानवी हितासाठी करणे. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि आर्थिक अनिश्चितता यांची चर्चा मोठ्या प्रमाणावर होत आहे. अशा वेळी मूलभूत विज्ञानाचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर येते. कारण तंत्रज्ञानाचा पाया हा मूलभूत ज्ञानावर उभा असतो. तो भक्कम नसेल, तर तंत्रज्ञानाचा विस्तार झाला तरी दीर्घकालीन प्रगती साधता येत नाही.

यंदा वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार कार्ल डाइसरॉथ, पीटर हेगेमन आणि जॉर्ज नागेल यांना प्रकाश-संवेदनशील आयन वाहिन्या आणि ऑप्टोजेनेटिक्सविषयीच्या संशोधनासाठी देण्यात आला. या संशोधनाने चेतापेशींच्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी विज्ञानाला एक नवे साधन उपलब्ध करून दिले. मानवी मेंदूची गुंतागुंत अद्याप विज्ञानासाठी मोठे आव्हान आहे. स्मृती कशा तयार होतात, भावना कशा निर्माण होतात, एखादी व्यक्ती विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रकारे का वागते आणि मेंदूतील बिघाडामुळे हालचाली किंवा विचारांवर कसा परिणाम होतो, अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी जगभर संशोधन सुरू आहे. 'ऑप्टोजेनेटिक्स' या तंत्रात प्रकाश-संवेदनशील प्रथिनांचा वापर करून विशिष्ट चेतापेशींची क्रिया नियंत्रित केली जाते. त्यामुळे मेंदूतील एखाद्या पेशीसमूहाची क्रिया बदलल्यावर त्याचा परिणाम काय होतो, हे संशोधक अधिक नेमकेपणाने तपासू शकतात. मेंदूच्या कार्याचा अभ्यास केवळ निरीक्षणापुरता मर्यादित न राहता कारण आणि परिणाम यांच्यातील संबंध समजून घेण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. या संशोधनामुळे मज्जासंस्थेचे विकार, हालचालींवरील नियंत्रण आणि मेंदूतील संदेशवहन याविषयीचे आकलन वाढण्यास मदत झाली आहे. भविष्यात या ज्ञानाचा उपयोग विविध न्यूरोलॉजिकल विकारांसाठी अधिक लक्ष्यित उपचार विकसित करण्यासाठी होऊ शकतो; मात्र संशोधनातील यश आणि सर्वसामान्य रुग्णांना उपलब्ध होणारा प्रत्यक्ष उपचार यांमध्ये मोठे अंतर असते. सुरक्षितता, परिणामकारकता आणि उपचारांचा खर्च या बाबींचीही कसून तपासणी करावी लागते.

भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात वैद्यकीय संशोधनाचा प्रश्न केवळ वैज्ञानिक प्रतिष्ठेचा नाही. चांगले उपचार परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होणे, ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचणे आणि आधुनिक निदानपद्धतींचा विस्तार होणे या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. विज्ञानाने आजार समजून घेतला; पण त्या ज्ञानाचा लाभ सामान्य माणसापर्यंत पोहोचला नाही, तर त्या प्रगतीचा सामाजिक अर्थ अपूर्ण राहतो. भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार फ्रान्सिस हॅल्झेन यांना आइसक्यूब न्यूट्रिनो वेधशाळेतील निर्णायक योगदान आणि खगोलीय उगम असलेल्या उच्च-ऊर्जेच्या न्यूट्रिनोंच्या शोधासाठी देण्यात आला. अंटार्क्टिकातील बर्फाच्या विशाल भागाचा वापर करून विश्वातून येणाऱ्या या सूक्ष्म कणांचे संकेत शोधले जातात. विश्वाचा अभ्यास करताना मानवाने दुर्बिणींच्या सहाय्याने दूरवरच्या आकाशगंगा, तारे आणि ग्रहांचे निरीक्षण केले; मात्र विश्वातील सर्व माहिती प्रकाशातूनच मिळते असे नाही. न्यूट्रिनोसारखे कण विश्वातील अत्यंत ऊर्जावान घटनांची माहिती देऊ शकतात. ते पदार्थांशी फार कमी परस्परक्रिया करत असल्यामुळे त्यांना शोधणे अत्यंत अवघड असते. आइसक्यूब वेधशाळेत बर्फाच्या आत बसवलेल्या संवेदकांच्या साहाय्याने न्यूट्रिनो पदार्थांशी क्वचित परस्परक्रिया करतात, तेव्हा निर्माण होणाऱ्या प्रकाशाचा माग घेतला जातो. या पद्धतीमुळे विश्वातील काही अतिदूर आणि ऊर्जावान स्रोतांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांना नवा मार्ग मिळाला आहे. या संशोधनातून लगेच सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात बदल होईल असे नाही; परंतु विज्ञानाचे महत्त्व केवळ तातडीने विकता येणाऱ्या उत्पादनांवर मोजणे चुकीचे आहे.

मूलभूत संशोधनामुळे नवी उपकरणे, संवेदन तंत्रज्ञान, संगणकीय विश्लेषण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य विकसित होऊ शकते. आज केवळ ज्ञानासाठी केलेले संशोधन उद्या अनपेक्षित तंत्रज्ञानाचा पाया ठरू शकते. भारताने अंतराळ संशोधनात उल्लेखनीय प्रगती केली आहे; मात्र अंतराळ मोहिमांबरोबरच मूलभूत भौतिकशास्त्र, खगोलभौतिकी आणि प्रगत उपकरणनिर्मिती यामध्येही दीर्घकालीन गुंतवणूक आवश्यक आहे. संशोधकांना केवळ प्रकल्प पूर्ण करण्यापुरते नव्हे, तर नवे प्रश्न विचारण्यासाठी आणि अनेक वर्षे त्यांची उत्तरे शोधण्यासाठी पाठबळ मिळाले पाहिजे. जागतिक वैज्ञानिक स्पर्धेत स्थान मिळवण्यासाठी ही संशोधनसंस्कृती निर्णायक ठरेल.

रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार हेन्री बी. कागान आणि केन्सो सोई यांना असममित सेंद्रिय संश्लेषणातील नॉन-लिनिअर परिणाम आणि स्वउत्प्रेरणाविषयीच्या संशोधनासाठी देण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे आरशातील प्रतिमांसारख्या असलेल्या रेणूंच्या दोन स्वरूपांपैकी विशिष्ट स्वरूपाची निर्मिती कशी घडू शकते, हे समजून घेण्यास मदत झाली. सजीवांच्या शरीरातील रासायनिक प्रक्रिया अत्यंत विशिष्ट पद्धतीने घडतात. अनेक रेणूंची रासायनिक सूत्रे समान असली, तरी त्यांची त्रिमितीय मांडणी वेगळी असू शकते. अशा रेणूंच्या दोन स्वरूपांचे गुणधर्महीवेगवेगळे असू शकतात. सजीवांमध्ये काही विशिष्ट स्वरूपाच्या रेणूंनाच प्राधान्य मिळते, ही बाब रसायनशास्त्रातील महत्त्वाच्या कोड्यांपैकी एक राहिली आहे.

असममित संश्लेषणाच्या मदतीने रासायनिक अभिक्रियेतून अपेक्षित स्वरूपाचा रेणू तयार करण्यावर नियंत्रण मिळवता येते. स्वउत्प्रेरणाच्या प्रक्रियेत अभिक्रियेत तयार झालेला पदार्थ पुढील अभिक्रियेला चालना देऊ शकतो. अशा प्रक्रिया रेणूंच्या निर्मितीतील निवडकता कशी वाढते, हे समजून घेण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. औषधनिर्मितीमध्ये या ज्ञानाचे विशेष महत्त्व आहे. एखाद्या औषधाच्या रेणूची रचना त्याच्या शरीरातील कार्यावर परिणाम करू शकते. त्यामुळे अपेक्षित स्वरूपाचा रेणू अचूकपणे तयार करणे, अनावश्यक उपउत्पादने कमी करणे आणि उत्पादनाची गुणवत्ता कायम ठेवणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात. भारत हा औषधनिर्मिती क्षेत्रातील मोठा उत्पादक देश आहे; परंतु औषधांचे उत्पादन करणे आणि नव्या औषधनिर्मिती तंत्रज्ञानाचा शोध लावणे यात फरक आहे. जागतिक बाजारपेठेत दीर्घकालीन नेतृत्व मिळवण्यासाठी भारताने मूलभूत रसायनशास्त्र, औषधविकास आणि प्रगत संश्लेषण तंत्रांमध्ये संशोधन वाढवले पाहिजे. यामुळे औषधनिर्मितीची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच नव्या उत्पादनांच्या विकासातही मदत होऊ शकते.

अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पुरस्कार रॉबर्ट ई. हॉल आणि मायकेल वुडफोर्ड यांना समग्र अर्थव्यवस्थेतील स्थैर्य समजून घेण्यासाठी सूक्ष्म आर्थिक पायाभूत तत्त्वांचा विकास केल्याबद्दल देण्यात आला. त्यांच्या संशोधनातून ग्राहकांचे निर्णय, भविष्यातील अपेक्षा, व्याजदर आणि चलनविषयक धोरण यांच्यातील संबंध समजून घेण्यासाठी महत्त्वाची चौकट विकसित झाली. अर्थव्यवस्थेचे आरोग्य मोजताना सकल देशांतर्गत उत्पादन, महागाई, बेरोजगारी आणि गुंतवणूक यांसारख्या आकडेवारीकडे लक्ष दिले जाते; मात्र या आकड्यांमागे लाखो कुटुंबांचे आर्थिक निर्णय आणि उद्योगांची भविष्यातील गणिते असतात. लोकांना पुढील काळात उत्पन्न वाढेल असे वाटत असेल, तर त्यांचा खर्च बदलू शकतो. उद्योगांना मागणी वाढण्याची अपेक्षा असेल, तर ते नव्या गुंतवणुकीचा विचार करू शकतात. उलट, अनिश्चितता वाढल्यास खर्च आणि गुंतवणूक कमी होऊ शकतात. मध्यवर्ती बँका व्याजदर बदलून अर्थव्यवस्थेतील मागणी आणि महागाईवर परिणाम घडवण्याचा प्रयत्न करतात; परंतु धोरणाचा परिणाम केवळ व्याजदराच्या प्रत्यक्ष बदलावर अवलंबून नसतो. भविष्यातील धोरणांविषयी नागरिक आणि उद्योग काय अपेक्षा करतात, यालाही महत्त्व असते. त्यामुळे आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी विश्वासार्ह धोरणे आणि स्पष्ट संवाद आवश्यक ठरतात. भारताच्या संदर्भात हा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. महागाई नियंत्रित ठेवणे, आर्थिक वाढ कायम राखणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि कर्जाची उपलब्धता सुनिश्चित करणे यांचा समतोल साधावा लागतो. व्याजदरातील बदलांचा परिणाम गृहकर्ज घेणाऱ्या कुटुंबांपासून लघुउद्योग आणि मोठ्या उद्योगांपर्यंत होतो. जागतिक बाजारातील तेलाच्या किमती आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडी यामुळे हे आव्हान आणखी वाढते, तरीही कोणतेही आर्थिक मॉडेल सर्व परिस्थितींचा अचूक अंदाज देऊ शकत नाही. आकडेवारीबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्था, उत्पन्नातील विषमता आणि असंघटित क्षेत्रातील रोजगार यांचा विचार करणे आवश्यक आहे. आर्थिक स्थैर्याचे मूल्यमापन करताना शेअर बाजारातील तेजी किंवा विकासदर एवढेच निकष पुरेसे नसतात. सामान्य नागरिकांच्या उत्पन्नात स्थिरता आहे का, रोजगाराच्या संधी वाढत आहेत का आणि जीवनावश्यक वस्तू परवडत आहेत का, हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. या चारही पुरस्कारांचा एकत्रित विचार केला, तर भारताच्या विकासासाठी काही स्पष्ट धडे मिळतात. पहिला धडा म्हणजे संशोधनासाठी दीर्घकालीन गुंतवणूक आवश्यक आहे. दुसरा म्हणजे मूलभूत विज्ञान आणि प्रत्यक्ष उपयोगातील तंत्रज्ञान यांच्यातील दुवा मजबूत केला पाहिजे. तिसरा म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवला पाहिजे.

चर्चा आजची

नको फटाक्यांचा कर्कश आवाज



वैभव पाटील

दिवाळी हा खरा तर दिपोत्सव. त्यात हे फटाके कुठून घुसले काय समजत नाही.पुर्वी दुष्ट शक्तींना जवळपास फिरकू न देण्यासाठी ढोला सारखी वाद्ये वाजवली जायची. कदाचित दिवाळी सारख्या मंगल सणामधे दुष्ट शक्तीचा वावर नको म्हणुन फटाके वाजवण्याची प्रथा आली असावी. फटाकेनिर्मितीत वापरले जाणाऱ्या रसायनांमुळे अनेक प्रकारचे आजार संभवतात. फटाक्यांमुळे हवा आणि वातावरण दूषित होते. त्यामुळे श्वसानाचे आजार वाढतात. ध्वनीप्रदूषणाची पातळीही वाढते. मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे श्रवण क्षमता कमी होते. फटाके फोडल्यामुळे विषारी वायू वातावरणात पसरतात. ओझोनचा थर पातळ होतो. कोणत्याही गोष्टीवर बंदी घातली तरी त्याचा वापर पूर्णपणे बंद होत नाही, याची असंख्य उदाहरणे आपणास पाहायला मिळतात. बंदी घातल्यानंतर त्याचा चोरी छुप्या पद्धतीने आणि गैरमार्गानेही वापर सुरूच राहतो. त्यामुळे अशा, सामाजिक प्रश्न निर्माण करणाऱ्या घटकांवर बंदी घालण्यापेक्षा त्यावर कायद्याचे नियंत्रण असणे अधिक महत्त्वाचे वाटते. जगभरामध्ये फटाक्यांसदर्भात निरनिराळे कायदे असून सरसकट बंदी घालण्याऐवजी त्या शहरांमध्ये फटाके वाजवण्यासाठी विशिष्ट कायदे तयार करण्यात आले आहेत. फटाके कधी आणि कुठे वाजवायचे यासंदर्भात कडक नियमावली प्रगत राष्ट्रांनी अंमलात आणली आहे. कोणीही रस्त्यावर उतरून फटाके वाजवत नाही, कारण तेथे कायदे काळजीपूर्वक पाळले जातात. तेथेही नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करून केले जात असले तरी त्यासाठी नियमावली असते. फटाक्यांची आतषबाजी करण्याची ठिकाणे मोकळ्या जागेत, शहराच्या वस्तीपासून लांब, नागरिकांना त्रास होणार नाही आणि अग्निरोधक यंत्रणा असलेल्या ठिकाणी होते. सामूहिक नियम आणि स्वयंशिस्तीतून अशा आतषबाजीचे कार्यक्रम होतात. परंतु, त्यानंतर कोणीही वैयक्तिक कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरात फटाके फोडत नाही. प्रगत देशात आणि आपल्यामध्ये हा फरक असल्याने आपल्याकडील कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी अधोरेखित होतात.

फटाक्यांमुळे वायुप्रदूषण होते. फटाक्यांमधून निघणारा कार्बन मोनॉक्साईड आणि अन्य विषारी वायुमुळे श्वसनाचे आजार निर्माण होतात. प्रदूषके श्वसनावाटे शरीरात गेल्यामुळे फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होते. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि गरोदर महिलांना यांच्या आरोग्यावर याचे दुष्परिणाम होता. आवाजामुळे नागरिकांच्या कानावर परिणाम होत असून ऐकण्याची क्षमता कमी होण्याबरोबरच मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. पाळीव प्राणी, शहरातील इतर प्राणी, पक्षी यांच्याही आरोग्यावर त्यांचे गंभीर दुष्परिणाम होताना दिसतात. याशिवाय फटाके फोडताना भाजण्याचे प्रकार, अपघाताच्या घटना यामुळे मानवी आयुष्यावरील फटाक्यांचे घातक परिणाम अधोरेखित होत असतात. फटाक्यांचा वापर होत असलेल्या काळामध्ये शहराच्या हवेमध्ये धुरक्याचे जाड थर तयार होतात. दिल्लीसह उत्तरेकडील राज्यांमध्ये अशा वातावरणात राहण्याची वेळ नागरिकांवर येत असते. फटाक्यांप्रमाणेच अन्य घटकांच्या धुराचाही समावेश त्यामध्ये होऊन त्यांचीही भर पडत राहते आणि शहराची हवा अधिकाधिक प्रदूषित होत राहते. विशेष म्हणजे, या फटाक्यांच्या निर्मिती आणि उद्योगांमध्येही अनियमितता आणि भ्रष्ट व्यवस्था आहे. बालकामगारांचा वापर, कायदेशीर प्रक्रियांकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार सर्रास घडतात. त्यामुळे हा उद्योग समाजाला धोकादायक ठरतो. परंतु त्यावर नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने सरकारी पातळीवर प्रयत्न होत नाहीत, हे त्यापेक्षा अधिक घातक आहे.

याशिवाय मध्यरात्री १० वाजल्यानंतर ध्वनिप्रदूषणाची मर्यादा पाळण्याचेही निर्देश दिलेले असतात. परंतु, याचे पालन होत नसल्याने रस्त्यांवर आवाजाचे फटाके वाजवून नागरिकांना वेठीस धरले जाते. विरोध झाल्यावर आतषबाजी किंवा आवाजविरहित फटाक्यांचा वापर करण्याकडे अनेकजण वळतात. परंतु, त्यामध्येही प्रदूषकांचे प्रमाण लक्षात घेतले जात नाही. मोकळ्या जागांवर फटाके वाजवण्यासाठी आपल्याकडे अशा जागाच राहिलेल्या नाहीत, हे देखील वास्तव आहे. पूर्वीच्या काळी फटाके महाग असल्यामुळे ते वाजवण्याकडे फार ओढा नव्हता. परंतु, आता नागरिकांची क्रयशक्ती वाढल्याने कितीही महाग फटाके खरेदी करून वाजवण्यास प्राधान्य दिले जाते. त्यामुळे नागरिकांनीच फटाके वाजवणार नाही यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. राजकीय नेतृत्वाने यादृष्टीने नागरिकांची मानसिकता बदलण्यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे. परंतु, अभिरुची बदललेल्याने अनेक राजकीय नेतेच जाहीर कार्यक्रमाच्या निमित्ताने फटाक्यांची आतषबाजी करतात. विजयी मिरवणुकीपासून ते नेत्यांच्या 'एन्ट्री'पर्यंत प्रत्येकवेळी फटाक्यांची आतषबाजी केली जाते. तरुणाईसमोर यामुळे चुकीचे आदर्श येतात आणि त्यांच्याकडूनही नेत्यांचे अंधानुकरण केले जाते.

लोकसंसद

देशद्रोह्यांना शोधण्यासाठी टास्कफोर्स उभारावा !

नाशिक जिल्ह्यातील सुप्रसिद्ध त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तशृंगी गड या २ प्रमुख देवस्थानांना बाँबने उडवण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आल्याने सुरक्षायंत्रणा सतर्क झाल्या आहेत. दिवाळीच्या सुटीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी होते त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून दोन्ही देवस्थानांच्या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुढील वर्षीपासून नाशिक नगरीत सुरु होणाऱ्या सिहंस्थ कुंभमेळ्याच्या धर्तीवर दोन्ही देवस्थानाना आलेली धमकी सुरक्षा यंत्रणांच्या दृष्टीने अधिक सजग राहण्यासाठी इशारा ठरली आहे. हिंदूंच्या सण-उत्सवांच्या काळात देवस्थानाना, धार्मिक स्थळांना धमक्या येण्याचे प्रकरण तसे नवीन नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतात अन्य पंथीयांच्या धार्मिक स्थळांना कधी धमक्यांचे ईमेल अथवा फोन येत नाहीत. प्रत्येक वेळेस हिंदूंची धार्मिक स्थळे आतंकवाद्यांच्या हिटलिस्टवर असतात. हिंदूंच्या सण उत्सवांसह स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन यांसारखे राष्ट्रीय उत्सवही दरवर्षी आतंकवादाच्या सावटाखाली साजरे केले जातात. त्यामुळे भारतात राहून, येथील सुख सुविधा उपभोगुन शत्रूराष्ट्रासाठी काम करणाऱ्या नमकहरामांना शोधून काढण्याची मोहीम अंतर्गत सुरक्षा व्यवस्थांनी वर्षभर राबवायला हवी. कोणतिही आतंकवादी कारवाई जशी स्थानिकांच्या साहाय्याशिवाय पूर्णत्वाला नेता येत नाही तसे अशा प्रकारचे धमकीचे ईमेल आणि फोनही देशातील देशद्रोह्यांची मदतीशिवाय करण्याचे धाडस कोणी करू शकत नाही त्यामुळे केंद्र सरकारने या देशद्रोह्यांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्पेशल टास्क फोर्स उभारावा !

– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

दिनविशेष

पक्षीशास्त्राचे भीष्माचार्य डॉ. सलीम अली!

भारताच्या निसर्गसंपदेत पशुपक्ष्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. निसर्गाचा समतोल राखण्यात पक्ष्यांची भूमिका मोलाची असते. मात्र, या पक्ष्यांचे जीवन, त्यांच्या सवयी, त्यांचे अधिवास आणि त्यांचे पर्यावरणातील महत्त्व यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून पक्षिशास्त्राला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे महान पक्षिशास्त्रज्ञ म्हणजे डॉ. सलीम अली होत. 'भारतीय पक्षिशास्त्राचे जनक' आणि 'बर्डमॅन ऑफ इंडिया' म्हणून त्यांची जगभर ओळख आहे. आज १२ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा परिचय करून घेणे औचित्यपूर्ण ठरेल.

डॉ. सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबई येथे एका सुलैमानी बोहरा मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. ते लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांच्या आईचेही निधन झाले. अगदी बालवयातच आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अली यांचा सांभाळ त्यांच्या मामांनी आणि मामींनी केला.

सलीम अली यांना लहानपणापासूनच पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांच्या मामांनी त्यांना एअरगन भेट दिली होती. एकदा त्यांनी या एअरगनने एका चिमणीसारख्या दिसणाऱ्या पक्ष्याची शिकार केली. मात

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ नोव्हेंबर

१) श्री.रमेश भास्कर नाईक मु.वरसोली, अलिबाग, १२-११-१९४२

२) श्रीम.स्मिता अरूण दांडेकर अलिबाग, १२-११-१९४८

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

ऐन दिवाळीत सरसगडावर भीषण वणवा

■ वनसंपदेसह पशू-पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथील ऐतिहासिक सरसगड किल्ल्यावर ऐन दिवाळीत भीषण वणवा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामुळे वनसंपदा व पशू-पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. स्थानिक दुर्गप्रेमी व वनविभागाकडून जीवावर उदार होऊन सायंकाळी साडेचारपर्यंत आगीवर नियंत्रणासाठी परिश्रम करण्यात आले.



आगीची तीव्रता आणि पसरणारा जाळ पाहता आगीवर नियंत्रणासाठी दुर्गप्रेमी केतन म्हसके, दत्तात्रय सावंत, नयन केदारी व चैतन्य पांडव यांच्यासह वनविभागाचे वनरक्षक अविनाश पाटील, वनविभाग कर्मचारी पांडुरंग पवार व नामदेव पुंजारे यांनी प्रत्यक्ष गडावर जाऊन जीवाची बाजी लावत आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. गडाचा तीव्र उतार, घनदाट झाडी-झुडपे, कुयलीचा त्रास आणि वणवा विझवण्यासाठी आवश्यक असलेल्या आधुनिक उपकरणांचा अभाव यांमुळे आग नियंत्रणात आणताना बचाव पथकाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. रात्री उशिरापर्यंत तळई बाजूकडील वणवा सुरू होता.

मागील अनेक वर्षांपासून दुर्गप्रेमी आणि स्थानिकांकडून सरसगडावर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन केले जात होते. मात्र, या वणव्यामुळे वर्षानुवर्षांची मेहनत क्षणांत जळून खाक होत आहे. वनस्पती व प्राण्यांबरोबरच गडावरील ऐतिहासिक ठेव्यासही या आगीमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे, असे दुर्गप्रेमी केतन म्हसके यांनी सांगितले.

वणवा लावणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी संबंधित प्रशासनाने तात्काळ, ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी तीव्र भावना पालीतील नागरिक व शिवप्रेमींमधून व्यक्त होत आहे.

सतत लागणाऱ्या या वणव्यांमुळे किल्ल्याची वृक्षराजी, दुर्मीळ वनसंपदा आणि वन्यजीवांचे अधिवास जळून खाक झाले असून पशू-पक्ष्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

आरिवर्क प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। कर्जत । प्रतिनिधी ।

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने भारताचे उद्योजकता विकास संस्था यांच्या वतीने महिलांसाठी विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

या उपक्रमांतर्गत महिलांना सध्या आरिवर्क या हस्तकलेचे २२ दिवसांचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आरिवर्क कलेचे व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करून उत्पन्नाचे साधन निर्माण करता येणार असून, त्यातून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

या प्रशिक्षण कार्यक्रमाला, यांनी भेट देऊन प्रशिक्षणाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी महिलांशी संवाद साधत त्यांच्या प्रगतीची माहिती घेतली आणि त्यांना प्रोत्साहन दिले. या माध्यमातून आरिवर्क, फूड प्रोसेसिंग, क्रोशे आर्ट, आर्टिफिशियल ज्वेलरी यांसह एकूण आठ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणांचा मुख्य उद्देश महिलांमध्ये उद्योजकतेची भावना विकसित करणे, त्यांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी सक्षम बनविणे आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणे हा आहे.



दौलतगडाच्या पायथ्याशी सावित्रीचे गंगापूजन

। महाड । प्रतिनिधी ।

■ घाणेकरीण बेटावर ६०० दिव्यांचा दीपोत्सव

दासगाव येथील दौलतगड प्रतिष्ठान दासगाव यांच्यावतीने यावर्षीही दिवाळी पहाट हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दूर्ग दौलतगडाच्या पायथ्याशी आणि सावित्री नदीच्या प्रवाहाने वेढलेल्या निसर्गरम्य घाणेकरीण बेटावर यावर्षी सावित्री नदीचे गंगापूजन आयोजित करण्यात आले होते. दिवाळी पहाटचा हा उपक्रम गेली तीन वर्षे सातत्याने सुरू असून, गंगापूजनाचे हे प्रथम वर्ष ठरले.

गांधारी, नागेश्वरी आणि काळनदी यांच्या संगमाने पवित्र झालेल्या या सावित्री नदीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिवाळी पहाटचे औचित्य साधून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी गंगापूजन करण्यात आले. नदीच्या पात्रात आणि घाणेकरीण घाटावर तब्बल ६०० दिवे पेटवून गंगाआरती करण्यात आली. दिव्यांच्या रोषणाईत उजळलेल्या सावित्री तटाचा नेत्रदीपक देखावा पाहण्यासाठी असंख्य भाविक उपस्थित होते.

या दरम्यान आजूबाजूच्या परिसरातील गावांनीही या सोहळ्याला मोठी भेट दिली. दासगावसह महाड परिसरातील तसेच सावित्री तटावरील विविध गावांतील नागरिक, महिला, युवक आणि ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने घाणेकरीण बेटावर दाखल झाली होती. गंगापूजन आणि गंगाआरतीचा सोहळा पाहण्यासाठी आलेले भाविक दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या सावित्रीचे दर्शन घेऊन भारावून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी श्री घाणेकरी मातेच्या समोर दिवे लावून सुस्वर भक्तीगीतांची दिवाळी पहाट साजरी झाली. स्वरांकित या गायन कार्यक्रमात अनेक कलाकारांनी आपली कला सादर केली. तसेच जय भवानी भजन मंडळाने पारंपरिक भजन सादर केले. भक्तीगीते, लोकगीते आणि पोवाडे यांनी कार्यक्रम रंगला.

मेघना सिटी येथे योग शिबीर

खांब : तालुक्यातील मेघना सिटी, वरसगाव (कोलाड) येथे रोप मल्लखांब व योग शिबिराचे पाच दिवस आयोजन करण्यात आले होते. दंतचिकित्सक डॉ. सायली मरवडे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सायली मरवडे या स्वतः राज्यस्तरीय मल्लखांबपटू असून त्यांना योगासने व प्राणायाम यांचेही उत्तम ज्ञान आणि अनुभव आहे. आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ नवीन पिढीला मिळावा, तसेच विद्यार्थ्यांमध्ये पारंपरिक क्रीडाप्रकारांविषयी आवड निर्माण व्हावी, या हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सध्याच्या डिजिटल युगात मुले मोबाईल, टीव्ही व इतर डिजिटल साधनांमध्ये अधिक वेळ घालवत असल्याचे चित्र दिसून येते. या पार्श्वभूमीवर मुलांना मैदानी खेळ व शारीरिक व्यायामाकडे आकर्षित करणे, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राखणे, मानसिक संतुलन विकसित करणे आणि एकाग्रता वाढविणे, हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. या शिबिरात एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



चिमुकल्या कलाकारांचा गौरव

पाताळगंगा : सरनोबत नेताजी पालकर सांस्कृतिक मंडळ, तुपगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या किल्ले स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा श्री संत गोरोबाकाका मंदिर, तुपगाव येथे उत्साहात पार पडला. गेल्या वीस वर्षांपासून मंडळाच्या वतीने सातत्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते किल्ले स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती करणाऱ्या बालकलाकार यांस पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. मुलांमधील सर्जनशीलता, कलागुण आणि ऐतिहासिक वारसा विषयीची आवड जोपासण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. यावेळी रुद्र, दिव्या, स्वरांजली यांनी संगीत गायनाने कार्यक्रमात रंगता आणली. तर स्वरा, प्राप्ती यांनी नृत्य सादरीकरण केले.

चालकांना दणका

रायगड : वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना वाहतूक पोलिसांनी कारवाईतून दणका दिला आहे. भाऊबीजेच्या पूर्व संध्येला २४७ चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून दोन लाख २७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे, टीबलशीट असणे अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी मंगळवारी (दि.१०) सकाळपासून कारवाई केली. नियम मोडणाऱ्यांना शिस्त लावण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती वाहतूक पोलिसांकडून सांगण्यात आले.



पाली येथे दिवाळी पहाट कार्यक्रम

पाली/गोमाशी : महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित दिवाळीनिमित्त संगीतमय कार्यक्रम दिवाळी पहाटचा कार्यक्रम गुजराती हॉल, पाली येथे मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळपासूनच हॉलमध्ये रसिकांनी गर्दी केली होती. दिवाळीच्या मंगलमय वातावरणात शास्त्रीय व सुगम संगीताच्या सुरांनी सकाळ प्रसन्न झाली. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक विक्रांत वाडे, रेश्मा पाटील, मीरा कार्लेकर आणि गंधार म्हात्रे यांनी आपल्या सुमधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. तबला, हार्मोनियम, गिटार अशा वाद्यांच्या साथीने कार्यक्रमाला रंगत आली. दिवाळी पहाटच्या निमित्ताने पारंपरिक अभंग, भावगीते, नाट्यगीते आणि दिवाळीची गाणी सादर करण्यात आली.

बालकांसोबत दिवाळी

रायगड : वंचित घटकांसाठी कार्यरत असलेल्या माणुसकी प्रतिष्ठानच्या सातव्या वर्धापन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे सचिव डॉ.राजाराम हुलवान यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बांधण येथील बालग्राम अनाथाश्रमात उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. बालकांना दिवाळी फराळ आणि फटाक्यांचे वाटप करण्यात आले. अनाथ बालकांसोबत दिवाळी उत्साहात साजरी करण्यात आली.

आदिवासी वाड्यांमध्ये मिठाई, कपड्यांचे वाटप

■ सामाजिक बांधिलकीचा अनोखा उपक्रम

। उरण । प्रतिनिधी ।

वनवासी कल्याण आश्रम, उरण तालुका यांच्या वतीने उरण तालुक्यातील विविध आदिवासी वाड्यांवर दिवाळीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

दिवाळी सण साजरा करूया, चला तोंड गोड करूया, आदिवासी वाडीत मिठाई वाटूया या संकल्पनेतून सोमवारी (दि.९) हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. सालाबादप्रमाणे यंदाही आश्रमाच्या कार्यकर्त्यांनी आदिवासी बांधवांच्या घरोघरी जाऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. काही ठिकाणी सामूहिक कार्यक्रमाचे आयोजन करून मिठाई आणि महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत अक्कादेवी वाडीतील ३५ कुटुंबे, केल्याचे माळ येथील ४५ कुटुंबे आणि विंधणे वाडीतील ६० कुटुंबांना दिवाळीचा आनंद देण्यात आला. मिठाई, साड्या आणि शुभेच्छांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

परतीच्या प्रवासात चिरनेर येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या १० कुटुंबांचीही भेट घेण्यात आली. तेथील कुटुंबांना आणि लहान मुलांना मिठाई, साड्या व कपड्यांचे वाटप करून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

सोनभैरव महिला बचत गटाचा अभिनव उपक्रम | **कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात भर**

पापड व्यवसायातून आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल

। माणगाव । प्रतिनिधी ।

खांदाड येथील महिलांनी आपल्या कष्टांना उद्योजकतेची जोड देत आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने एक नवी वाट निर्माण केली आहे. बचतीतून एकजूट, एकजुटीतून आत्मविश्वास आणि आत्मविश्वासातून व्यवसायाची उभारणी, असा प्रेरणादायी प्रवास सुरू करणाऱ्या 'सोनभैरव महिला बचत गटा'च्या पापड व्यवसायाचा शुभारंभ रविवारी (दि.८) उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



खांदाड गावचे अध्यक्ष काशीराम पोवार यांच्या हस्ते नारळ वाढवून या व्यवसायाचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार यांनी महिलांच्या या पुढाकाराचे विशेष कौतुक केले. दिवाळीच्या सणात महिलांनी एकत्र येऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. सोनभैरव महिला बचत गटाने विविध प्रकारचे दर्जेदार पापड तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला असून, त्यांच्या या प्रयत्नांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

खांदाडमधील महिलांनी एकत्र येत 'सोनभैरव महिला बचत गट, खांदाड' या नावाने स्वयंसहायता गटाची स्थापना केली आहे. या गटाच्या अध्यक्षपदी सुवर्णा पोवार यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी केवळ बचत करण्यापुरते मर्यादित न राहता स्वतःच्या कौशल्यावर व्यवसाय उभारण्याचा निर्धार केला आहे.

एकजुटीतून बचत, बचतीतून व्यवसाय आणि व्यवसायातून आर्थिक स्वावलंबन असा सकारात्मक संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे खांदाड परिसरातून स्वागत होत आहे.

आज या महिलांनी हातात घेतलेले पापड केवळ व्यवसायाचे साधन नाहीत, तर त्यांच्या स्वप्नांना आकार देणारी नवी आशा आहे. प्रत्येक महिलेच्या कष्टाला योग्य मोबदला, तिच्या कौशल्याला बाजारपेठ आणि तिच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, हीच या उपक्रमामागील खरी भावना आहे.

रोजगाराची संधी

पारंपरिक पद्धतीने तयार होणाऱ्या पापडांना व्यावसायिक स्वरूप देऊन बाजारपेठेत स्थान निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला रोजगार मिळण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडण्याची संधी निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे, अशा उपक्रमांतून महिलांना केवळ आर्थिक मदत मिळत नाही, तर निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणाही मिळते.

निवडक



कोमसाप श्रीवर्धनतर्फे दीपसंध्या कार्यक्रम

श्रीवर्धन : कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन शाखेच्या वतीने सोमवारी (दि.९) सायंकाळी श्री दत्त मंदिर सभागृह, श्रीवर्धन येथे दीपसंध्या हा गीत संगीताचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्रीवर्धनचे नगराध्यक्ष ॲड. अतुल अरविंद चौगुले हे प्रमुख अतिथी लाभले होते. प्रतिमा पूजन झाल्यावर कार्यक्रमास सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे प्रमुख सादरकर्ते गजानन करमरकर व डॉ. चिन्मयी मुरुडकर होते. तर त्यांना पार्थ पेंडसे, अविनाश गोगटे, सुनिल यादव, प्रसाद पेंडसे यांनी संगीताची उत्तम साथ केली. या कार्यक्रमाची संकल्पना विभावरी करमरकर यांची होती, तर प्रसाद जोशी यांनी निवेदन केले. कार्यक्रमात अभंग, भक्तीगीते, भावगीते, नाट्यगीते आदिंची रेलचेल होती. या कार्यक्रमाला रसिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. गजानन करमरकर यांनी गायिलेल्या भैरवीला तर रसिक श्रोत्यांनी स्वतः सहभागी होऊन जोरदार साथ दिली.



दिवाळी फराळासोबत ब्लँकेटचे वाटप

माणगाव : तालुक्यातील सुरव तर्फे तळे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका अनघा शेडगे यांनी ओराम्यान फाऊंडेशनच्या सहकार्याने सोमवारी (दि.९) सायंकाळी आदिवासी वाडीवरील विद्यार्थ्यांसाठी दिवाळी फराळ वाटपाचा विशेष उपक्रम राबविला. तसेच आगामी हिवाळ्यात विद्यार्थ्यांना थंडीपासून संरक्षण मिळावे आणि उबदारपणा लाभावा, या उद्देशाने १३ विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी वाडीपर्यंत पोहोचण्याचा मार्गही सोपा नव्हता. तब्बल सहा फूट उंच वाढलेल्या गवतातून वाट काढत शिक्षिका अनघा शेडगे यांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा ध्यास घेतला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी त्यांनी केलेली ही धडपड त्यांच्या सामाजिक जाणीवेची आणि शिक्षक म्हणून असलेल्या कर्तव्यनिष्ठेची प्रचिती देणारी ठरली. आपल्या मुलांसाठी शिक्षिका एवढ्या आस्थेने आणि आपुलकीने दुर्गम वाडीवर आल्याचे पाहून पालक भावूक झाले.



वृद्धांसमवेत दिवाळी साजरी

माणगाव : महाआराध्य प्रतिष्ठानतर्फे माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील बोरवाडी येथील माऊली वृद्धाश्रमातील वृद्धांना उटणे व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया, संचालिका अंकिता धारिया हे आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, या उदात्त हेतूने आपल्या प्रतिष्ठानमार्फत विविध सामाजिक, शैक्षणीक उपक्रम सातत्याने राबवित असतात. त्यामुळे या प्रतिष्ठानचे नाव आज रायगड जिल्ह्यात सर्वदूर पोहचले आहे. या प्रतिष्ठानतर्फे बोरवाडी येथील माऊली वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना उटणे व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिष्ठानच्या या कार्याचे कौतुक करताना प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचे आभार मानले. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक तथा अध्यक्ष प्रसाद धारिया, सदस्य दीप जाधव, सोहम हतीस्कर, प्रविण बागवे, अविनाश साळुंखे व सहकारी उपस्थित होते.



मुरुडमध्ये 'दीपसंध्या' संगीत मैफल

कोर्लई : मुरुडच्या सार्वजनिक वाचनालयातर्फे दीपावलीनिमित्त आयोजित करण्यात आलेला 'दीपसंध्या' हा सांस्कृतिक कार्यक्रम सुरेल संगीत मैफल आणि पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी युवा लेखिका राधिका संजय गुंजाळ यांच्या 'RUI & THE CURSE OF THE NAGAS' या इंग्रजी पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी लेखिका राधिका गुंजाळ यांनी आपल्या पुस्तकाच्या लेखनप्रवासाविषयी मनोगत व्यक्त केले. पुस्तकातील माहिती आणि काही अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर कथन केले. पुस्तकासाठी अभिप्राय देणाऱ्या प्रीतम वांळज यांचे त्यांनी विशेष आभार मानले. तसेच पुस्तकाच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. यावेळी राधिका गुंजाळ यांचा कोकण मराठी साहित्य परिषद, मुरुड शाखेच्या वतीने श्रीफळ, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट

आगरदांडा : अलिबाग मेडिकल असोसिएशन आणि जंजिरा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यातील शिघ्रे येथील नवीवाडी आदिवासी वस्तीमध्ये दिवाळी फराळ आणि चटईचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आदिवासी वस्तीतील लहान मुलांसह महिला व पुरुषांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. अलिबाग मेडिकल असोसिएशन आणि जंजिरा मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. याच सामाजिक बांधिलकीतून दिवाळीचे औचित्य साधत आदिवासी बांधवांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत दिवाळीचा आनंद गरजूंपर्यंत पोहोचविणाऱ्या अलिबाग आणि जंजिरा मेडिकल असोसिएशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

उरणच्या सर्कलवर बॅनरबाजांचा कब्जा

● चारफाटा, नवीन शेवा सर्कल बनले जाहिरातबाजीचे अड्डे ● प्रशासनाच्या अधिकारी वर्गाला कारवाईचा मुहूर्त सापडेना

| उरण | प्रतिनिधी |

उरणमधील चारफाटा आणि नवीन शेवा येथील सर्कल नेमके कशासाठी उभारले आहेत? वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी की बॅनरबाजांना फुकटात जाहिरातींचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी? असा संतप्त सवाल आता उरणकरांकडून विचारला जात आहे. सर्कलवर बॅनरचा असा काही विळखा पडला आहे की, सर्कल दिसण्यापेक्षा बॅनरच अधिक दिसतात! जणू काही या सर्कलचे अधिकृत आरक्षणच बॅनरबाजीसाठी करण्यात आले आहे.

शुभेच्छा असोत, वाढदिवस असोत, राजकीय कार्यक्रम असोत की जाहिरातींचा गाजावाजा; प्रत्येकाला आपला बॅनर याच सर्कलवर लावण्याची घाई! एक बॅनर उतरतो



न उतरतो तोच दुसरा हजर. मात्र, या बॅनरच्या गर्दीत वाहनचालकांची सुरक्षितता कुठल्या खड्ड्यात गाडली गेली आहे, याचे सोयरसुतक ना बॅनर लावणाऱ्यांना आहे ना प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना!

सर्कलवर लावण्यात येणाऱ्या बॅनरमुळे वाहनचालकांना समोरून येणारी वाहने स्पष्ट दिसत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत आहे. एखाद्या वाहनचालकाचा जीव गेला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? बॅनर लावणारा की खुर्चीवर बसून पगार घेणारा प्रशासनाचा अधिकारी? नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असताना अधिकारी वर्ग मात्र हातावर हात ठेवून बसला आहे.

विशेष म्हणजे, या प्रकाराबाबत वारंवार वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तक्रारीही करण्यात आल्या. मात्र, अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत तसूभरही फरक पडलेला नाही. जनतेच्या तक्रारींची दखल घेण्याऐवजी जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याची मानसिकता दिसत आहे. मग अधिकारी नेमके कशासाठी नेमले आहेत? केवळ खुर्च्या उबवण्यासाठी आणि कागदोपत्री कारभार करण्यासाठी? रस्त्यावरच्या समस्यांकडे डोळेझाक करायची असेल तर जनतेच्या पैशातून पगार घेण्याचा अधिकार तरी कशासाठी?

प्रशासनाला वारंवार सांगूनही कारवाई होत नसेल तर या बॅनरबाजांना कोणाचे अभय आहे, असा संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. नियम सर्वसामान्यांसाठी कडक आणि राजकीय प्रसिद्धीच्या बॅनरबाजांसाठी मवाळ, असा दुहेरी न्याय उरणमध्ये चालणार आहे का?

संबंधितांवर दंडात्मक कारवाईची मागणी

सर्कल वाहतुकीसाठी आहे, जाहिरातबाजी करण्यासाठी नाही! प्रशासनाने तातडीने चारफाटा आणि नवीन शेवा येथील सर्व अनधिकृत बॅनर हटवावेत, संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालावा. अन्यथा एखादा गंभीर अपघात घडल्यानंतर अधिकारी वर्गाने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करू नये. कारण आज प्रश्न केवळ बॅनरबाजीचा नाही, तर वाहनचालकांच्या जीवाचा आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे एखाद्याचा जीव जाण्याची वाट अधिकारी पाहत आहेत काय?

निवडक



वनराई बंधाऱ्यांच्या कामाचा शुभारंभ

मुरुड-जंजिरा : लायन्स क्लब मुरुड-जंजिरातर्फे प्रांतपाल लायन प्रवीण सरनाईक व ग्लोबल सर्व्हिस टीमचे जिल्हाध्यक्ष लायन अनिल म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड तालुक्यातील चिंचघर व नांदगाव येथे वनराई बंधाऱ्यांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या दोन्ही बंधाऱ्यांचा भूमिपूजन समारंभ जिल्हा प्रांतपाल लायन प्रवीण सरनाईक, ग्लोबल सर्व्हिस टीमचे जिल्हाध्यक्ष लायन अनिल म्हात्रे, माजी प्रांतपाल लायन संजीव सूर्यवंशी व पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पार पडला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे मुरुड लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन सी.एम. ठाकूर यांनी स्वागत केले. लायन्स इंटरनॅशनलच्या माध्यमातून या दोन्ही वनराई बंधाऱ्यांसाठी सुमारे आठ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबद्दल क्लबतर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. तसेच या सामाजिक उपक्रमाला हातभार लावण्यासाठी मुरुड लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन सी. एम. ठाकूर आणि माजी नांदगाव ग्रामपंचायत सदस्य नरेश कुबल यांनी वैयक्तिक प्रत्येकी ५० हजार रुपयांचा धनादेश प्रांतपाल लायन प्रवीण सरनाईक यांच्याकडे सुपूर्द केला. या वनराई बंधाऱ्यांमुळे परिसरातील पाणीसाठ्यात वाढ होऊन शेतकऱ्यांना शेतीसाठी मोठा फायदा होणार असून, शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास या उपक्रमाची निश्चितच मदत होईल, असे ग्लोबल सर्व्हिस टीमचे जिल्हाध्यक्ष लायन अनिल म्हात्रे यांनी यावेळी सांगितले.



दिव्यांच्या प्रकाशात उजळला अवचितगड

खांब : गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि संरक्षण ही केवळ जबाबदारी नसून प्रत्येक शिवप्रेमीचे कर्तव्य आहे. या भावनेतून शिवशंभू प्रतिष्ठानच्या वतीने गेली बारा वर्षे गडसंवर्धन व गडसंरक्षणाचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून दीपावलीचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील मेढा येथील ऐतिहासिक अवचितगडावर गडपूजन व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आपण ज्या गडाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याच गडावर दीपावलीचा सण साजरा करून ऐतिहासिक वास्तूंप्रती आदर व्यक्त करावा आणि गडांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी अवचितगडावर विधिवत गडपूजन करण्यात आले. त्यानंतर गडावर जागर-गोंधळाचा पारंपरिक कार्यक्रम पार पडला. गडावरील विविध ठिकाणी पणत्या व दिवे प्रज्वलित करण्यात आल्याने संपूर्ण अवचितगड दीपप्रकाशाने उजळून निघाला. ऐतिहासिक गडाच्या वास्तूंवर पडणारा दिव्यांचा प्रकाश आणि पारंपरिक जागर-गोंधळामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.



पायी वारी दिंडीचे प्रस्थान

खांब : सालाबादप्रमाणे याही वर्षी खांब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा दि.६ ते दि.२० नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. त्या अंतर्गत खांब येथून दि.६ नोव्हेंबर रोजी पायी दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे करण्यात आले आहे. स्वा.सु. अलिबागकरबाबा, गोपाळबाबा वाजे व धोंडूबाबा कोलाटकर यांच्या कृपार्शिर्वादाने कृष्णा जाधव, नडवली यांनी ही पायी दिंडीची परंपरा चालू केली आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली ही पायी दिंडी नडवली-खांब येथून दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. या दिंडी सोहळ्यात रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून विविध भागातून मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झाले आहेत. तर दिंडी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी दिंडीचे प्रमुखांसह अन्य वारकरी सदस्य मोलाचे सहकार्य करीत आहेत.

जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

पाताळगंगा : वाढदिवसाच्या सोहळ्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत खालापूर येथील पाटील पिता-पुत्रांनी एक आदर्श उपक्रम राबविला. अथर्व किशोर पाटील यांचा ९ नोव्हेंबर आणि लायन्स क्लब खालापूरचे अध्यक्ष किशोर नामदेव पाटील यांचा ११ नोव्हेंबर रोजी असलेला वाढदिवस महड येथील मनचक्षु संस्थेतील निराधार व्यक्तींसोबत साजरा करण्यात आला. या निमित्ताने लायन्स क्लब खालापूरच्या माध्यमातून संस्थेत वास्तव्य करणाऱ्या निराधार व्यक्तींना दिवाळी फराळ, ब्लँकेट, कपडे, मिठाई, चॉकलेट, फळे तसेच किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी अर्धवेळसाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- अलिबाग आवास परिसरामध्ये MST (Multy Skiled Techician+ Housekeeping + Gardner अर्जन्ट पाहिजेत मो. नं 8261066056 / 9370579163

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

शहाबाजमध्ये दीपोत्सवाचा प्रकाश

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करत सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा भव्य दीपोत्सव शहाबाज येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीशिव भैरव भजन मंडळ, शहाबाज यांच्या वतीने मंगळवारी (दि.१०) सायंकाळी श्री भैरवनाथ मंदिर परिसरात एक हजार १११ दिवे लावण्यात आले. या दिव्यांनी परिसर उजाळून निघाला दिपोत्सवाच्या या उपक्रमाचे हे ११ वे वर्ष होते.

मोबाईलच्या जगतामध्ये रमणाऱ्या पिढीने गावांमधील धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वारसा जपण्यासाठी दाखवलेली आस्था आणि सामाजिक बांधिलकी या



■ एक हजार १११ दिव्यांनी उजळले श्री भैरवनाथ मंदिर

उपक्रमातून अधोरेखित झाली. केवळ उत्सव साजरा करणे एवढाच मर्यादित हेतू न ठेवता, आपल्या संस्कृतीशी नाते जोडणे, गावातील नागरिकांना एकत्र आणणे आणि नव्या पिढीपर्यंत परंपरांचे महत्त्व पोहोचवणे, हा या उपक्रमामागील सकारात्मक विचार आहे.

एक हजार १११ दिव्यांच्या प्रकाशाने उजळलेला मंदिर परिसर, दीपोत्सवाचे मंगलमय वातावरण आणि परंपरेप्रती असलेली श्रद्धा यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाची सुरुवात नेहमीप्रमाणे भैरवनाथ या त्यांच्या ग्रामदेवतेच्या पूजनाने झाली. पहिला दिवा भैरवनाथाच्या चरणी डॉ.प्रगती पाटील यांच्या हस्ते अर्पण करण्यात आली. त्यानंतर आसपास संपूर्ण तलाव परिसर हा दिव्यांच्या रोषणाईने उजळून काढण्यात आला. या उपक्रमांम धून तरुणांमध्ये सामाजिक जाणीव, संघटन कौशल्य, सेवाभाव आणि आपल्या गावाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ होण्यास मदत झाली.

श्री शिव भैरव भजन मंडळाच्या माध्यमातून गेली अकरा वर्षे सातत्याने जपली जाणारी ही दीपोत्सवाची परंपरा निश्चितच कौतुकास्पद ठरली आहे. जुन्या परंपरांना आधुनिक पिढीची साथ मिळाल्यास गावाची सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध होऊ शकते, याचेच दर्शन या उपक्रमातून घडले.श्रद्धेचा प्रकाश, तरुणाईचा उत्साह आणि सामाजिक एकोप्याची भावना यांचा सुंदर संगम घडवणारा हा दीपोत्सव शहाबाजच्या सांस्कृतिक परंपरेतील एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

करंजाडी रेल्वे स्थानकात अजगराची सुटका

| महाड | प्रतिनिधी |

कोकण रेल्वे मार्गावरील महाड तालुक्यातील करंजाडी रेल्वे स्थानक परिसरात एका सिमेंटच्या पोत्यात पाच फूट लांबीचा जिवंत अजगर आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. रविवारी रात्री सिस्केप संस्थेच्या सदस्यांनी घटनास्थळी धाव घेत या अजगराची सुटका केली. हा अजगर रेल्वे मार्गावर कोणी आणि कोणत्या उद्देशाने आणून ठेवला, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

रविवारी सायंकाळी करंजाडी रेल्वे स्थानक परिसरात एका पोत्यामध्ये जिवंत वन्यप्राणी असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून सिस्केप संस्थेला देण्यात आली. त्यानुसार संस्थेचे शार्दुल वारंगे, योगेश गुरव आणि अन्य चार सदस्यांनी रात्री आठच्या सुमारास घटनास्थळी धाव घेतली. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून परवानगीने परिसराची पाहणी केली असता रेल्वे रुळालगत एका पोत्यामध्ये हालचाल होत असल्याचे दिसून आले. पोत्याची गाठ सोडून तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे पाच फूट लांबीचा अजगर आढळला. हा अजगर



■ तस्करीचा संशय
■ वनविभागाकडून तपासणीची मागणी

वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार संरक्षित असलेल्या शेड्यूल-१ प्रवर्गातील असल्याचे सांगण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, ही पिशवी रविवारी सकाळपासूनच रेल्वे रुळालगत पडून होती.

या घटनेनंतर अजगराची वैद्यकीय तपासणी करून त्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याची विनंती सिस्केप संस्थेच्या सदस्यांनी महाड वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली. दरम्यान, अजगराला अशा प्रकारे पोत्यात भरून रेल्वे स्थानक परिसरात कोणी आणले? त्यामागे तस्करीचा उद्देश होता की अन्य काही कारण, याचा तपास होणे आवश्यक आहे. वन्यजीवांचा जादूटोणा अथवा इतर गैरप्रकारांसाठी वापर होत असल्याची शक्यताही व्यक्त केली जात असून, मात्र त्याला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. कोकण रेल्वे मार्गावर अशा प्रकारे वन्यजीवांची अवैध वाहतूक होत आहे का, याची संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेण्याची मागणी होत आहे.



वरसगावातील युवकांनी साकारला रायगड

| खांब | प्रतिनिधी|

दिवाळी सणाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील वरसगाव येथील युवकांनी आपल्या कलाकौशल्य आणि मेहनतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडाची सुंदर प्रतिकृती साकारली आहे. या प्रतिकृतीमध्ये रायगड किल्ल्याचे बुरुज, तटबंदी, प्रवेशद्वार, पायऱ्या तसेच किल्ल्याची भौगोलिक रचना अत्यंत आकर्षक पद्धतीने उभारण्यात आली आहे. माती, दगड, विविध साहित्य आणि रंगांचा कल्पक वापर करून ही प्रतिकृती साकारण्यात आली आहे. ही प्रतिकृती साकारण्यासाठी भावेश कापसे, पारस ढोकरे, अर्चित धनवी, अर्णव कोदे, दर्शन ढोकरे, सोहम आब्रुस्कर, सार्थक कोदे, स्वयम कापसे, पार्थ जाधव आणि चैत्यन्य सानप या युवकांनी विशेष मेहनत घेतली.



● अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील अथर्व प्रकाश कोठेकर याने बनविलेला लोहगड किल्ला. (छायाचित्र : सचिन पाटील)



● चौलमधील श्रेयश सतीश कुलकर्णी या छोट्या बालकाने साकारली किल्ल्याची प्रतिकृती



● पनवेल येथे सुकापूर देवदमधील सनातन संकुलमध्ये छोट्या सेनेने 'सिंधुदुर्ग किल्ला' साकार केला आहे. अतिशय सुबक आणि योग्य परिश्रमाद्वारे 'सिंधुदुर्ग' किल्ल्याची प्रतिकृती तयार केली आहे. ही प्रतिकृती सक्षम खोत, रुद्र खोत, विहान सावंत, रुद्रप्रसाद वेदांतवर, अद्वैत चोपदार, कृष्णा लोंढे, चैतन्य आणि दक्ष या छोट्यांनी केली आहे. ही मांडणी अतिशय नेत्रदायक आणि उत्कृष्ट आहे. यामुळे हा देखावा जिवंत वाटतो.

पनवेल बसस्थानकात प्रवाशांची तुफान गर्दी | अलिबागच्या गाड्यांसाठी लांबच लांब रांगा

भाऊबीजेला लालपरी पुन्हा फुल्ल

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

भाऊबीजेच्या सणानिमित्त भाऊ-बहिणींच्या भेटीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी चाकरमानी आणि प्रवाशांनी गावाकडे जाण्याचा मार्ग धरला. त्यामुळे पनवेल एसटी परिवहन डेपोमध्ये बुधवारी (दि.११) सकाळपासूनच प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विशेषतः अलिबागकडे जाणाऱ्या लालपरीच्या बससाठी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र होते.

दिवाळीच्या सुट्ट्या आणि भाऊबीजेचा सण यामुळे एसटी बसस्थानक प्रवाशांनी गजबजून गेले होते. अनेक बहिणी भावाच्या



घरी जाण्यासाठी, तर काही भाऊ आपल्या बहिणीला भेटण्यासाठी प्रवास करत होते. कुटुंबासह गावाकडे निघालेल्या प्रवाशांची संख्या मोठी होती.

अलिबाग, पेण, रोहा, मुरूड आणि रायगड जिल्ह्यातील विविध गावांकडे जाणाऱ्या बसमध्ये जागा मिळवण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरू होती. बस येताच आसन पकडण्यासाठी प्रवाशांची लगबग होत होती. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांचीही मोठी संख्या दिसून आली. खासगी वाहनांचा खर्च परवडत नसल्याने अनेकांनी एसटीच्या लालपरीला पसंती दिली. सर्वसामान्य प्रवाशांसाठी आजही लालपरीचा प्रवास हा विश्वासाचा आणि परवडणारा पर्याय ठरत आहे.

सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसफेऱ्यांचे योग्य नियोजन करण्याची गरजही प्रवाशांकडून व्यक्त होत होती. गर्दीमुळे काही प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागत होती.

दरम्यान, बसस्थानकातील गर्दी, प्रवाशांची लगबग आणि गावाकडे जाण्याचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते.

बहिणीच्या भेटीची ओढ, कुटुंबासोबत सण साजरा करण्याचा आनंद आणि गावच्या मातीची हाक या सगळ्यांना सोबत घेऊन भाऊबीजेच्या दिवशी लालपरी पुन्हा एकदा प्रवाशांनी फुल्ल झाली!

दिपक महाडिक यांचा सन्मान

महाड : कुणबी समाजाच्या महाड-पोलादपूर शाखेचे उपाध्यक्ष दिपक महाडिक यांना 'परिवर्तनाचे साथीदार- सन्मान निस्वार्थी समाजकार्याचा' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी गेली अनेक दशके निस्वार्थी भावनेने समाजसेवेत स्वतःला झोकून दिले. कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई संलग्न कुणबी युवा मुंबई आयोजित कुणबी युवा मेळाव्यानिमित्त 'बळी पहाट-शोध इतिहासाचा, सत्य संस्कृतीचा' या सांस्कृतिक कार्यक्रमात साहित्य संघ मंदिर, चर्नी रोड, गिरगाव, मुंबई येथे हा सन्मान सोहळा पार पडला.

जुन्या गीतांनी रंगली दिवाळी पहाट

ज्येष्ठ नागरिकांच्या ओठांवर उमटला 'वन्स मोअर'चा सूर!

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दीपावली सणातील पाडव्याला विशेष महत्त्व आहे. या मंगलमय सणाचे औचित्य साधून खांदा वसाहतीतील आनंदी ग्रुप आणि रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने खांदेश्वर मंदिर परिसरातील निसर्गरम्य सरोवराच्या सान्निध्यात दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (दि.१०) सकाळी सहा वाजता निळ्याशार आकाशाखाली आणि प्रसन्न वातावरणात या संगीत मैफलीला सुरुवात झाली.



सुप्रसिद्ध गायिका स्नेहल पाटील आणि गायक रुपेश मढवी यांनी आपल्या सुमधुर आवाजात जुन्या मराठी गीतांची सुरेल मेजवानी सादर केली. विशेष म्हणजे, तब्बल पन्नास वर्षांपूर्वी खांदा कॉलनीत स्थायिक झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना या गीतांनी जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. अनेक वर्षांपूर्वी मनात घर करून राहिलेली गाणी पुन्हा कानावर पडताच ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. काही गाण्यांना उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे 'वन्स मोअर'ची दाद दिली. आजच्या आधुनिक संगीताच्या काळातही जुन्या गीतांची जादू कायम असल्याचे या मैफलीतून अनुभवायला मिळाले. लावणी, गवळण, विठ्ठलभक्तीपर गीते अशा विविध संगीत प्रकारांनी पहाट अधिकच रंगतदार झाली. गाण्यांच्या सुरांत तल्लीन झालेल्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना ही मैफल आणखी काही काळ सुरूच राहावी, असे वाटत होते.

आनंदी ग्रुपच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. याच सामाजिक बांधिलकीतून आयोजित केलेल्या या दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रुपच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

याप्रसंगी खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत १) सुरेखा अविनाश कोळी, २) ताराबाई रामचंद्र नाईक, ३) मंजुळा चंद्रकांत पाटील, ४) मालती धर्मेंद्र पाटील आणि ५) पदूबाई पंढरीनाथ म्हात्रे यांच्या मालकीची आहे. सदरहू मिळकतीच्या मालकी हक्काची पडताळणी करून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे पाले, ता. उरण, जि. रायगड

गट क्र. व उपविभाग	क्षेत्र आर.चौ.मी./हे.आर.चौ.मी.	आकार रू.
२३/६	०.३५.०० पो.ख. ०.२२.०० एकूण क्षेत्र ०.५७.०० पैकी क्षेत्र ०.३५.०० पो.ख. ०.०५.०० एकूण क्षेत्र ०.४०.००	०.४७ ०.४७

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कुणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून कोणत्याही स्वरूपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल,
दि. १०/११/२०२६

श्री. संकेत नामदेव मोहिते
वकील.
पत्ता : १०४, पहिला मजला, आदित्य विहार
महात्मा फुले मार्ग, जुन्या पोस्ट
जवळ, पनवेल ४१०२०६, जि. रायगड
मोबाईल नं. ९९३०११४२४२.

- जाहीर नोटिस-

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळवण्यास येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक मे. विध्दांत इन्फ्रा तर्फे भागीदार विजयकुमार जयंतीभाई वसोया व सिध्दांत मिलींद चव्हाण यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जाची, वहिवाटीची व खुद्द मालकीची आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे नागाव, ता.अलिबाग, गट नं. २०५२, जिरायत क्षेत्र १-०९-७० गुंठे (हे.आर.), पो.ख. ०-०१-३० आकार रु.१.७६/- ही जमीन मिळकत हा या जाहिर नोटिसचा विषय आहे.

सदर मिळकतीचे टायटल क्लिअर (मालकी हक्क), टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट देण्याकरीता व मालकी हक्काची खात्री करण्याकरीता माझ्या अशिलांनी मला नियुक्त केले आहे. सदरहू वर नमुद मिळकत ही मे. विध्दांत इन्फ्रा तर्फे भागीदार विजयकुमार जयंतीभाई वसोया व सिध्दांत मिलींद चव्हाण यांच्या पुर्ण मालकीची व ताबेकब्जात असून त्यांनी सदरहू मिळकत पुर्णपणे निर्वेध (free from encumbrance) असल्याचे सांगितले आहे.

तथापि सदर मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी.

जर मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास सदर मिळकतीचे टायटल पुर्णपणे साफ व निर्वेध (clear and Marketable) आहे असे समजुन आमच्या अशिलांच्या हितासाठी आम्ही टायटल सर्च रिपोर्ट व क्लिअरन्स सर्टिफिकेट जारी करु त्यानंतर आलेले आक्षेप किंवा दावे हे कायदेशिररित्या अवैध मानले जातील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१२.११.२०२६

ॲड. सिमरन आदित्य साठे
साठे ग्रुप ऑफिस, ११, लक्ष्मी केशव को. ऑ.हौ. सोसायटी, कौंडाळ तळे, पेण-रायगड ४०२१०७

भाऊबीजेने फुलले बहीण-भावाचे प्रेम



भाऊबीजेची लगबग पाहायला मिळते. बहिणींकडून आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट आणि पूजेची तयारी केली जाते. भावाच्या आवडीचे गोडधोड पदार्थ, फराळ आणि विशेष पक्वान्नांची मेजवानी तयार केली जाते. बहीण भावाला ओवाळते, कपाळावर टिळा लावते आणि त्याच्या उज्ज्वल भवितव्याची कामना करते. नोकरी, व्यवसायानिमित्त वेगवेगळ्या शहरांत राहणारे भाऊ-बहीण या निमित्ताने एकत्र येतात.

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दीपावली सणातील सर्वांत भावनिक आणि नात्यांमधील जिव्हाळा जपणारा दिवस म्हणजे भाऊबीज. दिवाळीच्या मंगलमय पर्वात भाऊबीजेला विशेष महत्त्व असून, या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाला औक्षण करून त्याच्या दीर्घायुष्याची आणि सुखसमृद्धीची प्रार्थना करते. तर भाऊ आपल्या बहिणीला प्रेमाची भेट देत तिच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहण्याचे आश्वासन देतो.

पहाटेपासूनच घराघरांत

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	Esti. Cost
Tend-25/26-27 7000042084	Supply of various type clamp, connectors and Nut bolts required under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee: Rs. 500/- + GST**	Rs. 15,12,515/- including taxes

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 09.11.2026 at 11:00 Hrs. to 20.11.2026 up to 11:00 hrs. Opening date: 20.11.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: The Executive Engineer (Admin)
Mob. No. 8412050202, **E-mail ID** se7200@mahatransco.in

Sd/-
Superintending Engineer,
EHV (O&M) Circle, Panvel

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक भुषण विजय पाटील व शांभवी भुषण पाटील यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मिळकत परिशिष्ट

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे आर प्रति	आकार रू. पै
४६	१/अ	०.२०.००	१.२७

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यतींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

सही/-
ॲड. कैलास अनंत बासरे

कर्जत नगरपरिषद, कर्जत
तालुका कर्जत, जिल्हा - रायगड

फोन क्र. ०२१४८-२२२०३३ पिन कोड ४१०२०१. E-mail :- karjatcouncil@gmail.com

जावक क्रमांक : कनप/महिला व बालकल्याण विभाग/२३६९/२०२६-२७ दिनांक:- ०९/११/२०२६

जाहीर निविदा सूचना

विषय :- कर्जत नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत कर्जत नगरपरिषद हद्दीतील महिलांना १) आरी वर्क २) बेकरी पदार्थ बनविणे ३) ज्वेलरी (दागिने) बनविणेचे प्रशिक्षण देणे बाबत.

अ.क्र	कामाचे नाव	निविदा फॉर्म रक्कम	अनामत रक्कम
१	कर्जत नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत कर्जत नगरपरिषद हद्दीतील महिलांना आरी वर्क चे प्रशिक्षण देणे बाबत.	१०००/-	५०००/-
२	कर्जत नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत कर्जत नगरपरिषद हद्दीतील महिलांना बेकरी पदार्थ बनविणे चे प्रशिक्षण देणे बाबत.	१०००/-	५०००/-
३	कर्जत नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत कर्जत नगरपरिषद हद्दीतील महिलांना ज्वेलरी (दागिने) बनविणेचे प्रशिक्षण देणे बाबत.	१०००/-	५०००/-

१. निविदा पत्रक विक्रीची तारीख दिनांक १२/११/२०२६ ते २०/११/२०२६. सायं ५.०० पर्यंत असून निविदा स्विकारण्याचा कालावधी दिनांक २०/११/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजे पर्यंत राहिल.
२. निविदे बाबतचा सर्व सविस्तर तपशील निविदा फॉर्म मध्ये नमूद केला असून निविदाधारकास सर्व अटी शर्ती बंधनकारक राहतील.

सही/-
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

- जाहीर नोटिस-

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळवण्यास येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक मे. विध्दांत इन्फ्रा तर्फे भागीदार विजयकुमार जयंतीभाई वसोया व सिध्दांत मिलींद चव्हाण यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जाची, वहिवाटीची व खुद्द मालकीची आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे नागाव, ता.अलिबाग, गट नं. २१९४, जिरायत क्षेत्र ०-१८-०० गुंठे (हे.आर.), आकार रु.३.३७/- ही जमीन मिळकत हा या जाहिर नोटिसचा विषय आहे.

सदर मिळकतीचे टायटल क्लिअर (मालकी हक्क), टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट देण्याकरीता व मालकी हक्काची खात्री करण्याकरीता माझ्या अशिलांनी मला नियुक्त केले आहे. सदरहू वर नमुद मिळकत ही मे. विध्दांत इन्फ्रा तर्फे भागीदार विजयकुमार जयंतीभाई वसोया व सिध्दांत मिलींद चव्हाण यांच्या पुर्ण मालकीची व ताबेकब्जात असून त्यांनी सदरहू मिळकत पुर्णपणे निर्वेध (free from encumbrance) असल्याचे सांगितले आहे.

तथापि सदर मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी.

जर मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास सदर मिळकतीचे टायटल पुर्णपणे साफ व निर्वेध (clear and Marketable) आहे असे समजुन आमच्या अशिलांच्या हितासाठी आम्ही टायटल सर्च रिपोर्ट व क्लिअरन्स सर्टिफिकेट जारी करु त्यानंतर आलेले आक्षेप किंवा दावे हे कायदेशिररित्या अवैध मानले जातील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१२.११.२०२६

ॲड. सिमरन आदित्य साठे
साठे ग्रुप ऑफिस, ११, लक्ष्मी केशव को. ऑ.हौ. सोसायटी, कौंडाळ तळे, पेण-रायगड ४०२१०७

दिनांक : ११/११/२०२६.

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, मौजे वावंढळ, ता. खालापुर जि. रायगड येथील, सर्व्हे नं. हिस्सा नं.३३/१+२+३+४/३-ब, ३३/५-ब/१+२+४+५ब+२+१+३/२,३३/१+३/अ/१+५-अ,३३/५अ(२)/५(१),३३/१+२+४/२+३अ,३३/२अ२,३३/२अ-१/२,२४/२ड, ३४/२ क पैकी प्लॉट नं. १५, एकुण क्षेत्र ४५० चौ. मी. हि मिळकत नंदनवन को. हौ. सो. या नावे ओळखली जात असून त्या मिळकतीमध्ये निवासी बांधकाम केलेले असून त्याला ग्रामपंचायत घर मालमत्ता क्रमांक २६१, क्षेत्र ८४.५४ चौ. मी बिल्टअप आर. सी. सी. मिळकत सदरील मिळकतीमध्ये कोणाचा गहाण, दान लिज, लायसेन्स, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, विलपत्र, इजमेंट, साठेखत, खरेदीखत, लेखी अथवा तोंडी साठेकरार, पोटगी हक्क, बोजा, वारसहक्क अगर कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष येवून हरकत नोंदवावी व मालकी हक्काबाबत शहानिशा करून द्यावी. वरील मुदतीत कोणाकडूनही हरकत न आलेस आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर कोणाचीही, कसलीही हरकत, तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. करिता ही जाहीर नोटीस सर्वांचे माहितीसाठी दिली असे.

पनवेल,
दि.११/११/२०२६

सही/-
ॲड. रजनी एम. पाठे
बीएल.एसएल.एलबी
यशकिरण सोसायटी, पहिला मजला
शॉप नं. ८, सावरकर चौकाजवळ
पनवेल- ४१०२०६
मो.नं. ८४४६४७३०७७

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे माणगाव ठाकूरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या सर्वे नं ६/७ या शेतजमिनीपैकी, खाते क्र. ३१ मधील श्री. विनयचंद यादवसिंह कोठारी, यांचे मालकीहक्काची जमीन कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

माणगाव ठाकूरवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील मिळकतीचे वर्णन.

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.प्र	आकार
६	७	एकुण ०.९४.०० पैकी श्री. विनयचंद यादवसिंह कोठारी, यांचे मालकीचे विकत घेण्याचे ठरलेले क्षेत्र ०.७७.०० हे.आर.प्र	०.५६

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधितांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली.

तारीख १२.११.२०२६

सही/-
ॲड. रवीन पालेकर
२०१, हरलीन हाईट्स, राजे साहजी मार्ग, लाभ दर्शन बिल्डिंगजवळ, दहिसर (पूर्व), मुंबई
४०००६८ मो : +९१ ९८९२०५९७३६
ई-मेल : kbhansaliconsultancy@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रविण जनार्दन ठाकूर यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग क्र.	क्षेत्र	आकार
चेंढरे, ता. अलिबाग	९७/३/१/१/१/१/४	बिनशेती १.३७.३५	०.००

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक यांचेसोबत खरेदी-विक्री संदर्भात बोलणी करुन सदर मिळकत खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहीवाटीचे हक्क, वारसा हक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व त्याच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१०/११/२०२६

सही/-
ॲड. राकेश नारायण पाटील
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५/८४३२६२०००५

दिनांक ११/११/२०२६

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. अभिजीत जयवंत म्हात्रे, २. प्रितेश जयवंत म्हात्रे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
सुरई ता. अलिबाग	१९८	क्षेत्र ०-२२-९० पो.ख. ०-०१-५० एकूण क्षेत्र ०-२४-४०	५.१२

दिनांक :- ११/११/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे. एस. एम कॉलेज जवळ अलिबाग रायगड मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने असे कळवणेत येते की, माझे अशिल श्री. रमेश नामदेव म्हात्रे, रा.आभा सिएचयस, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड यांनी खाली वर्णन केलेली समीर बाळकृष्ण म्हात्रे यांचे नावे असलेली जमिनीची मिळकत खरेदी करण्याचे ठरवलेले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे आकुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत

स.न.	क्षेत्र हे. आर.चौ. मी	आकार रू. पै.
९३/२	०.०५.८० पो.ख. ०.००.५० एकूण ०.०६.३०	०.७८

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ति किंवा संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १२/११/२०२६
मो. ९९६०८२२५०९

खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
ॲड. कामिनी गणेश म्हसकर
पत्ता : शॉप न.३, गुरुकृपा अपार्टमेंट, विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ	आकारणी रु.पै.
४५/४	एकूण क्षेत्र ३-८१-०० हे.आर, या पैकी बाजाली तुकाराम आरदवाड याचे खाते नं. ६५६ ज्याचे क्षेत्र १-२१-०० हे.आर या मिळकतीबाबत	२.५०

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-१२/११/२०२६
ॲड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक - (१) शैला गिरीधर ठाकूर (७/१२ उतारा प्रमाणे शैला गिरीधर पाटील) आणि (२) उत्तरा आत्माराम पाटील यांचे सदर मिळकतीमधील मालकी हक्क आम्ही आमच्या अशिलांकरिता तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही वि

निवडक



तळाघर येथील कबड्डी खेळाडूंचा सन्मान

खांब : रोहा तालुका शिवसेना (उबाठा) गटाकडून नवतरुण तळाघर येथील कबड्डी खेळाडूंचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. ३७ वी रायगड जिल्हा किशोर गट निवड चाचणी व अजिंक्य पद धेरंड येथील कब्बडी स्पर्धेत नवतरुण तळाघर हा संघ अंतिम विजेता ठरल्याबद्दल रोठ बुद्रुक सरपंच नितीन वारंगे व शशिकांत साळुंके तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंचा यथोचित सन्मान केला. दरम्यान, तळाघर हा संघ रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात एक नावाजलेला संघ म्हणून ओळखला जात आहे. तर कबड्डी खेळात आतापर्यंत तळाघर गावामध्ये अनेक कबड्डी पट्ट निर्माण केला आहे. तसेच त्यांनी वेळोवेळी आपल्या संघाचे नेतृत्व करून गावाचे नाव रोशन केले आहे. तर हाच कबड्डी खेळाचा वारसा नव्या पिढीकडून जपला जात असून विविध स्पर्धेत सातत्याने कामगिरी करताना दिसत आहेत. तर निवड चाचणी व अजिंक्य स्पर्धेतील उज्ज्वल कामगिरी केलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सरपंच नितीन वारंगे व अन्य शिवसैनिकांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

श्रमिका पाटीलची भरारी

रायगड : अलिबाग तालुक्यातील महाजने येथील श्रमिका पाटील हीने क्रीडा स्पर्धेत भरारी मारली आहे. दिल्ली येथे झालेल्या स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया या नॅशनल गतका मार्शल आर्ट या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारतात तिसरा क्रमांक मिळवून यश संपादन केले. तिच्या या यशाने महाजने गावासह अलिबाग तालुका व रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. श्रमिका पाटील ही अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयात शिक्षण घेत असून सध्या बारावीमध्ये आहे. अलिबागच्या श्रमिकाने जिल्ह्यात सुवर्णपदक पटकावले.



शालेय गतका मार्शल आर्ट स्पर्धेत भारतात तिसरी

त्यानंतर तिची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले. महाराष्ट्राच्या स्पर्धा सोलापूर येथे झाल्या. त्या ठिकाणी श्रमिकाने सुवर्णपदक मिळवल्याने तिची राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली.शालेय राष्ट्रीय स्पर्धा दिल्ली येथे नुकत्याच झाल्या. यामध्ये महाराष्ट्राला गतका या खेळामध्ये पहिल्यांदा पदक मिळवणारी श्रमिका ही महाराष्ट्राची पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. यासाठी गतका संघटनेच्या महाराष्ट्राच्या सचिव प्राध्यापक आरती चौधरी तसेच संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष कवळे, रोहन गुरव, राष्ट्रीय पंच वेदिका कवळे, तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक बजरंग गुरव यांनी विशेष मेहनत घेतली. श्रमिका कराटे ब्लॅक बेल्ट आहे. गेल्या वर्षी तिने खेलो इंडिया गतका स्पर्धेत रौप्यपदक मिळवले होते. याबद्दल श्रमिकाचे गावातील आणि आजूबाजूची सर्व नागरिकांनी एकत्र येऊन विजयाची मिरवणूक काढून तिचा सन्मान केला होता. शालेय राष्ट्रीय स्पर्धेत पदक मिळवल्यामुळे यावर्षी देखील श्रमिकाची खेलो इंडिया गतका स्पर्धेसाठीसाठी निवड झालेली आहे.

सूर्यकुमारची मुंबईच्या कर्णधारपदी नियुक्ती

मुंबई : टी-२० विश्वचषक २०२६ जिंकणारा कर्णधार सूर्यकुमार यादव आगामी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये मुंबईचे नेतृत्व करणार आहे. या देशांतर्गत टी-२० स्पर्धेसाठी १६ सदस्यांच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी १४ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. मुंबई आपल्या मोहिमेची सुरुवात त्याच दिवशी कोलकात्यात हैदराबादविरुद्धच्या सामन्याने करेल. मुंबईला ग्रुप डी मध्ये ठेवण्यात आले असून, या गटात त्यांच्यासोबत गुजरात, गोवा, विदर्भ, छत्तीसगड, ओडिशा आणि उत्तराखंड हे संघ आहेत. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी मुंबईचा संघ: सूर्यकुमार यादव (कर्णधार), अथर्व अंकोलेकर, अंगकृष्ण रघुवंशी (विकेटकीपर), शम्स मुलानी, दिव्यांश सक्सेना, मॅक्सवेल स्वामीनाथन, सुवेद पारकर, मुशीर खान, शार्दुल ठाकूर, सरफराज खान, मोहित अवस्थी, साईराज पाटील,सिल्वेस्टर डिसोझा, शिवम दुबे, हार्दिक तामोरे यांचा संघात समावेश केला आहे.



डॉ. सायली यांनी दिले मल्लखांबाचे धडे

कोलाड : डॉ. सायली मरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड येथील मेघना सिटीमध्ये रोप मल्लखांब व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पाच दिवस आयोजित करण्यात आलेल्या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शारीरिक क्षमता, लवचिकता, संतुलन आणि मानसिक एकाग्रता वाढविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराच्या मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ. मरवडे यांनी जबाबदारी सांभाळली. विशेष म्हणजे, डॉ. मरवडे यांनी शैक्षणिक पदवी प्राप्त करूनही त्यांनी क्रीडाक्षेत्रातील आपली आवड आणि जिद्द कायम ठेवली असून त्या स्वतः राज्यस्तरीय खेळाडू आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञानासोबतच क्रीडाक्षेत्रातील अनुभवाचा उपयोग त्यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी केला. रोप मल्लखांबासारख्या साहसी आणि कौशल्यपूर्ण क्रिडा प्रकारा सोबत योगाचे महत्त्वही या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. अशा उपक्रमांमुळे लहान मुलांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, शिस्त आणि खेळाविषयी आवड निर्माण होण्यास निश्चितच मदत होते. पाच दिवसांच्या या शिबिरातून सहभागी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली. स्थानिक स्तरावर अशा क्रीडा व योगविषयक उपक्रमांचे आयोजन होणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे.



मुंबईचा थरारक विजयी चौकार

।। अखेरच्या तासात रेल्वे घसरली ।। २७ गुणांसह अग्रस्थानी

। मुंबई । प्रतिनिधी ।

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईने रोमहर्षक विजय मिळवताना रेल्वेवर १०६ धावांनी वर्चस्व गाजवले. सामना संपायला अवघ्या तासाभराचा अवधी शिल्लक असताना मुंबईने रेल्वेचे अखेरचे पाच फलंदाज बाद केले. याबरोबरच मुंबईने सलग विजयी चौकार लगावताना 'ड' गटात अग्रस्थान कायम राखून उपांत्यपूर्व फेरीत एक पाऊल टाकले.

ब्रेबॉर्न स्टेडियमवर झालेल्या या लढतीत सिद्धेश लाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईने दिव्यांश सक्सेनाच्या (१३६ चेंडूंत नाबाद १०० धावा) शतकाच्या बळावर दुसरा डाव ४ बाद २३४ धावांवर घोषित केला. त्यामुळे मुंबईने विजयासाठी रेल्वेपुढे ३७२ धावांचे लक्ष्य ठेवले. रेल्वेचा दुसरा डाव मात्र ७७.२ षटकांत २६५ धावांत आटोपला. एकवेळ ते ५ बाद २५० अशा सुस्थितीत होते. इशान गोयल





(१०३) व झुबैर अली (११५) यांनी झुंजार शतके साकारली. मात्र मुशीर खान (४२ धावांत ३ बळी) व तनुष कोटियन (९३ धावांत २ बळी) यांनी अखेरच्या तासाभरात शतकवीरांसह उर्वरित बळी मिळवले. त्यामुळे मुंबईने थरारक विजय नोंदवला व ६ गुण मिळवले. आता थेट जानेवारीत दुसऱ्या टप्प्यात मुंबईचा संघ पुढील साखळी सामने खेळणार आहे.

दरम्यान, देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रतिष्ठेचे स्थान असलेल्या रणजी स्पर्धेच्या ९२ व्या हंगामाला ११ ऑक्टोबरपासून प्रारंभ झाला. गतवर्षीप्रमाणे यावेळीसुद्धा रणजी स्पर्धा दोन टप्प्यांत खेळवण्यात येत आहे. या स्पर्धेचा पहिला टप्पा ११ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत पार पडला. या काळात प्रत्येक संघ चार सामने खेळले गेले. दरम्यानच्या काळात विजय हजारे एकदिवसीय स्पर्धा व सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धा रंगेल.

अखेरच्या तासात पलटवार

सूर्यांश शेडगेने मिड-ऑफवरून डावीकडे धावत अलीचा झेल टिपला. तनुष कोटियननेही शॉर्ट मिडविकेटवर आठव्या विकेटसाठी एकहाती अप्रतिम झेल घेतला. त्यामुळे ५ बाद २५० वरून रेल्वेची गाडी रुळावरून घसरली.

तत्पूर्वी, सामन्याच्या अखेरच्या दिवशी मुंबईने आघाडीत आणखी ६० धावांची भर घालत रेल्वेसमोर विजयासाठी ३७२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. रात्री नाबाद राहिलेला सक्सेना याने १३६ चेंडूंत ८ चौकार आणि एका षटकारासह नाबाद १०० धावा केल्या. रेल्वेने झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण मुंबईच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणापुढे त्यांचा निभाव लागला नाही.

रेल्वेकडून सलामीवीर ईशान गोयलने १०३ धावांची, तर सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अलीने ११५ धावांची शानदार शतकी खेळी केली. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी १६७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. तब्बल २१२ चेंडूंचा सामना करत त्यांनी १५६ मिनिटे मुंबईच्या गोलंदाजांना यशापासून दूर ठेवले. मात्र, अखेरच्या तासात मुंबईच्या खेळाडूंनी रेल्वेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले.

तीन विजय बोनस गुणासह आहेत. मुंबईने अनुक्रमे चंदीगड व हिमाचल प्रदेशला डावाने धूळ चारली होती, तर गेल्या लढतीत हरयाणावर १० गडी राखून विजय मिळवला. रणजी स्पर्धेत एक डाव राखून अथवा १० गडी राखून विजय मिळवल्यास सहा गुणांसह अतिरिक्त १ बोनस गुण (एकूण ७ गुण) दिला जातो. आता रेल्वेला नमवल्याने मुंबईने सहा गुणांची कमाई केली.

दृष्टांतची रायगडच्या संघात निवड

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भिसेगावचा युवा क्रिकेटपटू दृष्टांत भोईर याची रायगड जिल्ह्याच्या १४ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे भिसेगावसह संपूर्ण कर्जत तालुक्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दृष्टांतला लहानपणापासूनच क्रिकेटची आवड असून, २०२१ पासून त्याने यंग्स स्पोर्ट्स क्रिकेट क्लब येथे लेदर बॉल क्रिकेटचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. प्रशिक्षक सागर सावंत (दादू) यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर त्याने आपल्या खेळात उल्लेखनीय प्रगती केली आहे. विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत त्याने 'मॅन ऑफ द मॅच' तसेच 'मॅन ऑफ द



सिरीज' यांसारखे पुरस्कारही मिळवले आहेत.

दृष्टांतने क्रिकेटसोबतच शैक्षणिक क्षेत्रातही आपली गुणवत्ता कायम राखली आहे. गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल, कर्जत येथे शिक्षण घेत असताना अभ्यास आणि क्रिकेटचा सराव यांचा उत्तम समतोल साधला आहे. रायगड क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित निवड चाचणीत प्रभावी कामगिरी करत त्याने जिल्ह्याच्या १४ वर्षांखालील संघात स्थान निश्चित केले आहे.

दृष्टांतच्या या यशामागे त्याचे आई-वडीलांचे प्रोत्साहन व मोलाची साथ लाभली आहे. भिसेगावसारख्या ग्रामीण भागातून पुढे येत जिल्ह्याच्या क्रिकेट संघात स्थान मिळवणे ही कर्जत तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. दृष्टांतच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील क्रिकेट आणि शैक्षणिक वाटचालीसाठी त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

कसोटीसाठी न्यूझीलंडचा संघ जाहीर



वेलिंग्टन : भारताविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांसाठी न्यूझीलंडने त्यांचा १४ सदस्यीय तगडा संघ जाहीर केला. दुखापतीमुळे वन डे मालिकेला मुकलेले रचीन रवींद्र, डेव्हॉन कॉनवे यांचे संघात पुनरागमन झाले आहे. दोन सामन्यांची ही कसोटी मालिका १९ नोव्हेंबरपासून सुरू होईल. न्यूझीलंड संघ: टॉम लॅथम (कर्णधार), टॉम ब्लंडेल, डेव्हन कॉनवे, जेकब डफी, मॅट हेन्री, काईल जेमिसन, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, नॅथन स्मिथ, ब्लेअर टिकनर, विल यंग यांचा संघाच समावेश केला आहे.

एसओएममध्ये पी.टी. उषा यांचा पराभव

नवी दिल्ली : भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्षा पी.टी. उषा यांना उत्कृष्ट गुणवत्ता क्रीडापटू (एसओएम) निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. महिलांच्या गटातील चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. ऑलिम्पिक पदक विजेती सायना नेहवाल आणि माजी खेळाडू अंजू बॉबी जॉर्ज, राणी रामपाल आणि डोला बॅनर्जी विजयी झाल्या. महिलांच्या चार जागांसाठी एकूण सहा उमेदवार रिंगणात होत्या. यापैकी सर्वाधिक मते मिळवणाऱ्या चार उमेदवारांची निवड करण्यात आली. अंजू बॉबी जॉर्ज यांनी ५३ मते मिळवून अव्वल स्थान पटकावले. राणी रामपाल यांना ५०, डोला बॅनर्जी यांना ४५ आणि सायना नेहवाल यांना ४३ मते मिळाली. दरम्यान, आयओए अध्यक्षा पी.टी. उषा यांना ४० मते मिळाली, तर अनिता पॉल दुराई यांना केवळ सहा मते मिळाली. महिलांच्या गटात एकूण ८० मते पडली.डिसेंबर २०२२ मध्ये पी. टी. उषा यांची भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली. हे पद भूषवणारी ती पहिली महिला ठरली. परिणामी, ऑलिम्पिक पदकाच्या निवडणुकीतील त्यांचा पराभव हा आयओएममध्ये त्यांच्यासाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. ही निवडणूक यासाठीही महत्त्वाची आहे, कारण आयओएच्या कार्यकारी परिषदेच्या निवडणुका ५ डिसेंबर रोजी होणार आहेत. या निवडणुकांमध्ये २०२६ ते २०३० या कालावधीसाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड केली जाईल.





पेणमध्ये इनडोअर क्रिकेट अॅकॅडमीचा शुभारंभ

। पेण । क्रीडा प्रतिनिधी ।

पेण नगरपरिषदेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या टर्फ इनडोअर क्रिकेट स्टेडियमचे नुकतेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू केदार जाधव यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यानंतर आता या स्टेडियममध्ये पेण तालुक्यातील युवा मुला-मुलींना दर्जेदार क्रिकेट प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने पेण स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने सुसज्ज व आधुनिक क्रिकेट अॅकॅडमी सुरू करण्यात आली आहे. या अॅकॅडमीला रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांचे नाव देण्यात आले आहे.

पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे

■ क्रिकेटपटू केदार जाधव यांच्या हस्ते लोकार्पण

अध्यक्ष अरुण शिंदे, प्रशांत ओक, देवेंद्र पाटील, मनोहर अहिर, दिनेश सावंत, प्रसाद देशपांडे, मनोज कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही अॅकॅडमी कार्यरत राहणार आहे.

या कार्यक्रमाला भूषण मोरे, योगेश पवार, सचिन सिंगरपुरे, विवेक ठाकूर, तुषार हजारे, प्रफुल्ल टेमघरे, मनोज नाझरे, शाम पाटील, तुषार सावंत, शेखर भागत, सागर मुळे यांच्यासह पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अनेक माजी खेळाडू सहकुटुंब उपस्थित होते.

विश्व नेमबाजीत भारताचा सुवर्णवेध

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयएसएसएफ विश्व नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी दमदार कामगिरी करत देशाच्या पदकतालिकेत आणखी दोन पदकांची भर घातली. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल सांघिक प्रकारात ईशा सिंह, मनू भाकर आणि दिव्या थाडिगोल सुब्बाराजू यांच्या त्रिकुटाने सुवर्णपदकावर नाव कोरले. तर पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन सांघिक प्रकारात ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर, अखिल श्योराण आणि नीरज कुमार यांनी कांस्यपदकाची कमाई केली. या स्पर्धेतील भारताचे हे दुसरे सुवर्णपदक ठरले.

दोहा येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तूल सांघिक प्रकारात भारतीय संघाने एकूण १७६१-६८ एक्स गुणांची कमाई केली. भारतीय नेमबाजांनी सुरुवातीपासूनच अचूक निशाणा साधत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले.

■ मनू भाकर, दिव्याची ऐतिहासिक कामगिरी

■ महिलांच्या २५ मीटर पिस्तूल संघाला सुवर्ण



कोरियाच्या संघाने १७४८-६६एक्स गुणांसह रौप्यपदक मिळवले, तर व्हिएतनामने १७४५-५४एक्स गुणांसह कांस्यपदक पटकावले.

भारतीय संघाकडून ईशा सिंहने सर्वाधिक ५९०-२५एक्स गुणांची नोंद केली. मनू भाकरने ५८७-२४एक्स, तर दिव्या थाडिगोल सुब्बाराजूने ५८४-१९एक्स गुणांचे योगदान दिले. या कामगिरीच्या जोरावर ईशा आणि मनू यांनी वैयक्तिक अंतिम फेरीतही स्थान मिळवले.

मात्र, वैयक्तीक अंतिम फेरीत दोघींनाही पदकाने हुलकावणी दिली. मनू भाकरने २७ हिट्ससह चौथे स्थान मिळवले, तर ईशा सिंह ११ हिट्ससह आठव्या क्रमांकावर राहिली. सांघिक सुवर्णपदकानंतर वैयक्तिक प्रकारातही पदक मिळवण्याची संधी दोघींना होती; मात्र त्यांचे आव्हान अंतिम फेरीत संपुष्टात आले.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन सांघिक प्रकारात भारतीय नेमबाजांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर, अखिल श्योराण आणि नीरज कुमार यांच्या भारतीय संघाने एकूण १७५१-९१एक्स गुण मिळवत कांस्यपदकावर शिक्कामोर्तब केले.

या स्पर्धेत चेक प्रजासत्ताकने १७५४-९२एक्स गुणांसह सुवर्णपदक जिंकले. नॉर्वेने १७५२-८१एक्स गुणांसह रौप्यपदक मिळवले. भारताकडून ऐश्वर्य प्रताप सिंह तोमरने ५८७-३३एक्स गुणांची नोंद केली. नीरज कुमार आणि अखिल श्योराण या दोघांनी अनुक्रमे ५८२-३१एक्स आणि ५८२-२७ एक्स गुण मिळवले.

या स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी यापूर्वीही पदकांची कमाई केली आहे. गुरुवारी झालेल्या पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात जयपाल मालवीयने दबावाखाली उत्कृष्ट संयम दाखवत रौप्यपदकाची कमाई केली.

सहा मैदानांवर रंगणार महासंग्राम | २५६ संघांचा होणार सहभाग

रोह्यात रंगणार कबड्डी चाचणीचा थरार

। रोहा । प्रतिनिधी ।

कबड्डीच्या मैदानावर पुन्हा एकदा रायगडच्या मातीत खेळाडूंच्या कौशल्याचा आणि ताकदीचा थरार अनुभवायला मिळणार आहे. ग्रुप ग्रामपंचायत वरसे आणि सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ४,५ व ६ डिसेंबर २०२६ रोजी वरसे येथे रायगड जिल्हा अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील तब्बल २५६ संघ सहभागी होणार असून एकूण सहा मैदानांवर तीन दिवस कबड्डीचा महासंग्राम रंगणार आहे. अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी दिली.

तरुणाईला व्यसनांपासून दूर ठेवून क्रीडा क्षेत्राकडे आकर्षित करणे, त्यांच्यातील सुप्त क्रीडागुणांना वाव देणे आणि कबड्डी खेळाला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतून निवडण्यात येणारे ४० गुणवंत खेळाडू रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरीय स्पर्धेत करणार आहेत.

वरसे येथील आर. व्ही. फार्म येथे आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, कबड्डी खेळाचा इतिहास आपण १९६२ पासून अनुभवत आलो आहोत. आपल्या तालुक्यात आजही जवळपास १०० ते १५० कबड्डी संघ कार्यरत आहेत.

या स्पर्धेसाठी सहा कबड्डी मैदाने तयार करण्यात येणार असून जिल्ह्यातील २५६ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला मोठी रंगत येणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंमधून ४० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून हाच रायगड जिल्ह्याचा संघ राज्यस्तरावर खेळणार आहे. विशेष म्हणजे कबड्डी क्षेत्रातील नामवंत खेळाडू रिशांक देवाडिगा, अस्लम इनामदार आणि सोनाली यांनाही या स्पर्धेसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे कबड्डीप्रेमींना नामवंत खेळाडूंची उपस्थिती अनुभवण्याची संधी मिळणार आहे.



याप्रसंगी ॲड. मनोजकुमार शिंदे, हेमंत कांबळे, रामा म्हात्रे, नरेश पाटील, अमित मोहिते, दिनेश कांबळे,जयवंत घरत, आतेश पडवळ, कबड्डी संघटनेचे पदाधिकारी तसेच कबड्डीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **दीपावलीच्या मुहूर्तावर काहीतरी नवीन आणि वेगळे करण्याच्या संकल्पनेतून ही जिल्हास्तरीय निवड चाचणी आपल्या परिसरात आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून खेळाच्या माध्यमातून आपले व्यक्तिमत्त्व घडवावे आणि कबड्डीच्या माध्यमातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा हा या आयोजनामागील मुख्य हेतू आहे.**
> **-मधुकर पाटील, उपाध्यक्ष रायगड जिल्हा परिषद**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)